दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मराठी भाषेला ज्ञानभाषा करण्याची गरज; देवेंद्र फडणवीस यांचे वक्तव्य

नवी मुंबई : जर्मन-जपानी भाषा या शिकण्याबरोबरच त्या भाषेचा बोलीभाषेवर परिणाम न होता व्यवहारिक भाषेत तेथील नागरिकांकडून वापर केला जात आहे. मात्र महाराष्ट्राची मराठी भाषा मात्र आपण केवळ बोलण्यापूर्ती वापरतो. ज्या मराठी भाषेची इतर देशांना भूरळ आहे, ज्या मराठी संस्कृतीचा इतर देशांमध्ये गोडवा गायला जातो, त्या मराठी भाषेला आता ज्ञानभाषा करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाशी येथील सिडको एक्जीबिशन सेंटरमध्ये सुरू असलेल्या विश्व मराठी संमेलन २०२४ मध्ये मार्गदर्शन करताना केले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना फडणवीस यांनी मराठी भाषेची देशभरात पोहोचलेली महती मांडली. मॉरिशसमध्ये आज महाराष्ट्र सरकारने आठ कोटी रुपये खर्च करून मराठी भवन बांधले आहे. त्या ठिकाणी मराठीचा एक वेगळा दबदबा निर्माण झाला आहे. त्यामुळे मराठी भाषेला एक वेगळी ओळख मॉरिशसमध्ये प्राप्त झाली आहे.

* (आष्टी) वर्धा * सोमवार दि.२९/०१/२०२४ * वर्ष : २ * अंक : २०१ * पाने : ८ * किंमत : ५ रु * मुख्य संपादकः- राहुल गजरे * उपसंपादकः- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादकः-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242

मराठा आरक्षणाला विरोध करण्यासाठी तीन ठराव संमत; भुजबळ यांची माहिती

दैं, जनप्रभात मुंबई : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाची गेल्या पाच महिन्यांपासून सुरू असलेली लढाई जिंकली आहे. २० जानेवारीला जालनाच्या अंतरवाली सराटी गावातून मुंबईच्या दिशेने मोर्चा घेऊन निघालेल्या जरांगेंना सरकारने मुंबईत येऊ दिले नाही. २६ जानेवारीच्या पहाटे नवी मुंबईच्या वाशीमध्ये दाखल झालेल्या जरांगेंना सरकारच्या शिष्टमंडळाने तिथेच थोपवून ठेवले. त्यानंतर त्यांच्या सर्व मागण्या मान्य करत राज्य सरकारने जरांगे समोर नमते घेतले. मात्र आता मराठा आरक्षणाला विरोध करण्यासाठी ओबीसी समाजाकडून तीन ठराव मंजूर करण्यात आले आहेत. राष्ट्रवादीचे (अजित पवार) नेते छगन भुजबळ यांनी यासंदर्भात माहिती दिली. ओबीसी नेत्यांच्या बैठकीनंतर ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. मराठा आरक्षणासंदर्भात मागण्या मान्य झाल्यानंतर आज राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांच्या सिद्धगड निवासस्थानी ओबीसी नेत्यांची बैठक पार पडली. यानंतर माध्यमांशी बोलताना छगन भुजबळ म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत आमचा विरोध कधीच नव्हता. मात्र आमच्या भटक्या विमुक्त ओबीसी बांधवांचा घास काढून घेतला जातो आहे, त्यांचा आम्हाला संताप आहे. आम्हाला २७ टक्के आरक्षण जाहीर झालं आहे, पण ते अद्याप पूर्ण मिळालेले नाही. ओबीसीला धक्का लावणार नाही, असं म्हणता आणि मागच्या दाराने वाटेकरी घुसवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप छगन भुजबळ यांनी केला.छगन भुजबळ म्हणाले की, आयोगातील मुळ सदस्यांना राजीनामा का द्यावा लागला हे त्यांना विचारावे लागेल. आता त्या ठिकाणी नवीन लोक घेतली आहेत. त्यांना आता मराठा समाजाला आरक्षण द्यायचे आहे, हा अजेंडा देण्यात आला आहे. आधी हा ओबीसी आयोग होता, पण आता हा मराठा आयोग झाला आहे, असा आरोप करतानाच छगन भुजबळ म्हणाले की, मागासवर्ग आयोगात कोणत्या जातीशी संबंधित नसलेला व्यक्ती समितीत नसावा, अशी अट आहे, पण न्यायमुर्ती सुप्रे समितीवर आहेत. ते मराठा समाजाला आरक्षण द्यायचे आहे, याच पद्धतीने काम करत आहेत. मराठा समाजाला वेगळं आरक्षण दिले असते, तर आमचा विरोध नव्हता, पण ओबीसी आरक्षणात तुम्ही वाटेकरी वाढवले, त्याला आमचा विरोध आहे. कारण वेगळ्या आरक्षणासोबत कुणबी प्रमाणपत्र देऊन डबल आरक्षण देत आहेत, अशेही छगन भुजबळ म्हणाले.तीन ठराव संमतमहाराष्ट्र शासनाने मराठा आरक्षणा संदर्भात सगेसोयरे या शब्दाची व्याख्या बदलून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब दिनांक २६ जानेवारी २०२४ नुसार मसूदा काढला आहे. यामुळे ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आपला हा निर्णय मूळ ओबीसीवर अन्याय करणारा आहे. त्यामुळे दि. २६



जानेवारी २०२४ च्या राजपत्राचा मसूदा रद्द करण्यात यावा.महाराष्ट्र सरकार नियुक्त न्या. संदीप शिंदे समिती ही असंविधानी असून, मागासवर्ग आयोग नसताना मराठा-कुणबी/कुणबी-मराठा जात नोंदींचा शोध घेऊन कोणत्याही मागासवर्ग आयोगाने (राज्य किंवा राष्ट्रीय आयोग) मराठा समाजाला मागास ठरविलेले नसताना समितीच्या शिफारशीवरून प्रशासनाकडून मराठा कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण केले जात आहे. सदर मराठा-कुणबी/कुणबी-मराठा प्रमाणपत्रांचे वितरणाला स्थगिती देण्यात यावी.

भारतीय संविधानातील आर्टिकल ३३८ (ब) प्रमाणे उपरोक्त निकालाच्या आधारे संबंधित जाती घटकाबाबत आसक्ती नसलेले सदस्य नियुक्त करणे अपेक्षित असताना न्या. सुनील सुक्रे, ओमप्रकाश जाधव, प्रा. अंबादास मोहिते या मराठा आरक्षण या विषयाबाबत आसक्ती असलेल्या व्यक्तींचा मागासवर्ग आयोगावर बेकायदेशीर पध्दतीने नियुक्त्या केल्या. त्याचबरोबर मागासवर्ग आयोगाचे सदस्य आणि अध्यक्ष हे इंदिरा सहानी खटल्यातील निकालाप्रमाणे संबंधित जातीशी आसक्ती असलेले नसावेत असे अपेक्षित असताना मागासवर्ग आयोगाचे नवनियुक्त अध्यक्ष श्री सुनील शुक्रे हे मराठा समाजाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यामुळे राज्य मागासवर्ग आयोग व न्यायमुर्ती शिंदे समिती रद्द करण्यात यावी, असे तीन ठराव यावेळी करण्यात आले.हेही वाचा – खछ्ड तड एछ्ब्ब्: २३० धावांचे लक्ष्य गाठणे शक्य होते, पण; पराभवानंतर रोहित शर्मा भावूकदरम्यान, छगन भुजबळ यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला माजी मंत्री राम शिंदे, आ. गोपीचंद पडळकर, आ. नारायण मुंडे, खा. समीर भुजबळ, आ. पंकज भुजबळ, आगरी समाजाचे राजाराम पाटील, मुस्लिम ओबीसी नेते शब्बिर अन्सारी, माजी सनदी अधिकारी महेश झगडे, आ तुकाराम बिडकर, मागासवर्गीय आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके, कुणबी सेनेचे विश्वनाथ पाटील, दौलतराव शितोळे, सत्संग मुंडे, कल्याण दळे, दशरथ पाटील, ऍड. सुभाष राऊत, प्रा. दिवाकर गमे, शंकरराव लिंगे, ईश्वर बाळबुद्धे, बाळासाहेब कर्डक, यांच्यासह विविध संघटना आणि समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुलीने दिले वडिलांच्या चितेला

भडाग्नी कंधार तालुक्यातील संगुचीवाडी येथील घटना

दैं, जनप्रभात लोहा प्रतिनिधी /विश्वनाथ शिंदे



लोहा व कंधार या दोन्ही तालुक्यातील असंख्य गावे, वस्त्या, वाडी-तांडे हे खडकाळ आणि उंच-सखल, डोंगर-दऱ्यात माळरानाच्या माथ्या-पायथ्यावर वसलेली आहेत. या भागात आजही जुनी चली-रीती, रूढी-परंपरा प्रमाणे लोक जीवन आचरण करतात. कायद्यानुसार मुलींना समान अधिकार दिला असला तरी प्रत्यक्षात मुलींना मुलांचे अधिकार नाहीत. परंतु संगुचीवाडी येथील एक वृध्द नागरिक मयत झाल्यानंतर सर्व जुन्या चालिरीतीला फाटा देत वडिलांच्या चितेला मुलीने अंत्यसंस्कार क्रियाकर्म करून भडाग्नी दिला.कंधार तालुक्यातील संगुचीवाडी येथील दामोधर निवृत्ती रुंजे यांना एक मुलगा व एक मुलगी असे दोन अपत्य होते. त्यापैकी मुलगा अविवाहित असताना मागील सहा सात वर्षांपूर्वी मयत झाला होता. तर जयश्री रूंजे या मुलीचे लग्न झाल्याने त्या लोहा येथे वास्तव्यास आहेत. दि. २५ जानेवारी रोजी गुरुवारी दामोधर निवृत्ती रुंजे (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मुलगा नसल्यामुळे त्यांच्या अंत्यसंस्कार हा भाऊ, पुतण्या कडून व्हावा असा सूर उपस्थितातून होत असताना कांहीं सुज्ञ आणि पुढारलेल्या विचारांच्या नागरिकांतून मुलीने अंत्यसंस्कार विधी केला तर चुकीचे कांहीं नसल्याचे सांगितल्याने मग मुलगी जयश्री भुजंग जकवाड- रूंजे या त्यांच्या मुलीने अंत्यसंस्काराचे शिकाळे धरन्यापासून ते चितेला अग्नी देण्यापर्यंतचे सर्व विधी उरकल्या. ग्रामीण भागात आजही रूढी परंपरा ताठर पणाने असताना सर्व जुन्या चालीरीती परंपरेला फाटा देत जयश्री यांनी वडिलांच्या चीतेला दिलेला अग्नी परिसरात चर्चेचा विषय बनला आहे.

कपील ठाकूर महाराष्ट्र शासनाच्या गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्काराने



दै,जनप्रभात

सन्मानित आर्वी :- मागील अनेक वर्षापासून जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात एक उत्कृष्ठ क्रीडा प्रशिक्षक म्हणून ठसा उमटविणारे कन्नमवार विद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक कपिल ठाकूर यांना प्रजासत्ताक दिनानिमित्य जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते सन्मानचिन्हसह रोख रकम देवून सन्मानित करण्यात आले. कपील ठाकूर हे मागील ३० वर्षापासून कन्नमवार विद्यालय येथे क्रीडा प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहे. प्रशिक्षक कपील ठाकूर यांनी आर्वी तालुक्यातील विविध वयोगटातील व्हॉलीबॉल खेळाडूंना मार्गदर्शन करून जिल्हा, विभाग, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यामागे मोलाचा वाटा राहाला. प्रशिक्षक म्हणून काम करीत असतांना त्यांच्या मार्गदर्शनात अनेक खेडाळू राज्यस्तरावर पाहचले तर ५७ खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. शालेय वयोगटातील खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत कन्नमवार विद्यालयाला नावलौकिक मिळून देण्यात ठाकूर यांचा सिंहाचा वाटा आहे. हे बघता स्थानिक शासकीय अधिकाऱ्यानी यांच्या कार्याची दाखल घेत यांना तालुका क्रीडा मार्गदर्शक म्हणून जवाबदारी दिली. हि जवाबदारी सांभाळत असतांना त्यांनी विविध शाळेतीलअनेक खेळाडू घडविले. हेच नव्हे तर अनेक खेळाडू खेळाच्या माध्यमातून शासकीय सेवेत रुजू झाले. सातत्याने अनेक वर्षापासून क्रीडा क्षेत्रातअसंख्य खेळाडू घडविणारे ठाकूर यांच्या कार्याची दखल घेत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते रोख रकमेसह सन्मान चिन्ह व पुरस्कार देवून पान २ वर

जाहीरपणे छत्रपती शिवाजी महाराजांची घेतलली शपथ पूर्ण केली; मुख्यमंत्री शिंदेंनी केलं मराठा समाजाचं अभिनंदन.



दै,जनप्रभात उपसंपादक राठोड रमेश पंडित

दिनांक २८ जानेवारी २०२४. मराठा आरक्षणविषयक विजयी सभेत मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका मांडली. यावेळी त्यांनी आंदोलक नेते मनोज जरांगे यांच्या कार्याचं कौतुक केलं तसेच मराठा समाजानं शांततेनं आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आंदोलन केलं त्याबद्दल आभार मानले. तसेच आपण दिलेला शब्द पाळतो, जाहीरपणे छत्रपती शिवाजी महाराजांची घेतलेली शपथ पूर्ण केली, असं सांगितलं.मुख्यमंत्री पुढे म्हणाले, मराठा संघर्ष नेता मनोज जरांगे पाटील यांच मी अभिनंदन करतो. व्यासपीठावरुन मुख्यमंत्री म्हणून मी आपल्याला सांगतो की, सगळ्या जगाचं लक्ष या आपल्या सकल मराठा समाजाच्या आंदोलनाकडं लागलं होतं.आपली एकजूट आपण कायम ठेवली आणि अतिशय शिस्तीनं हे आंदोलन आपण मनोज जरांगेंच्या नेतृत्वाखाली केलं. कुठंही या आंदोलनाला गालबोट न लावता हे आंदोलन आपण यशस्वी केलं याबद्दल मी इतर तुमचे अभिनंदन करतो जरांगेंचं आपल्यावर असलेलं प्रेम आणि तुमच्यावर असलेलं प्रेम आम्ही पाहिलं. शेवटी मराठा समाज आपला न्याय हक्क मागताना इतर कोणालाही त्रास नको याची काळजी घेतली, यासाठी मुख्यमंत्री म्हणून मी आपल्या सर्वांना मनापासून धन्यवाद देतो.मी शेतकऱ्याचा मुलगा आहे मलाही गोरगरीब मराठ्याची कल्पना आहे. मी जाहीरपणे छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेतली होती तो शब्द मी पूर्ण केला आहे. दिलेला शब्द पाळणं हीच माझी कार्यपद्धती आहे.आज आमच्या दिघे साहेबांची जयंती आहे, बाळासाहेबांची जयंती २३ तारखेला झाली. या दोन्ही गुरुवर्यांचे आशीर्वाद आणि मराठा समाजाच्या शुभेच्छा देखील आमच्या पाठीशी आहेत. जमलेल्या मराठा बांधव-भगिनींचं स्वागत करतो. अण्णाभाऊ पाटील यांच्या भूमीत हा ऐतिहासिक सोहळा साजरा होतो आहे, याचा आनंद आहे, असंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

आष्टी तालुक्यात तालुकास्तरीय वकृत्व स्पर्धेत हुतात्मा राष्ट्रीय इंग्रजी माध्यम ची निधी लांडगे प्रथम

दै,जनप्रभात आष्टी (शहीद):- प्रतिनिधी



श्री.समर्थ वाचनालय व लोकमान्य विद्यालय, आष्टी यांचे संयुक्त विद्यमाने स्व. शेषराव कृष्णराव राजकारणे स्मृती तालुकास्तरीय आंतर शालेय 'वक्तृत्व स्पर्धा' गुरुवार दि. २५ जानेवारी २०२४ ला सकाळी ८.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विविध विद्यालयातील प्रत्येक गटातून एक विद्यार्थी या स्पर्धे करीता पाठविण्यात आले होते. त्यातील गट अ वर्ग ८ ते १० विषय – ''मोबाईल व्यसनमुक्ती – काळाची गरज'' या विषयावर हुतात्मा राष्ट्रीय इंग्रजी माध्यम शाळा आष्टी ची विद्यार्थिनी कु. निधी प्रशांत लांडगे हिने अतिशय प्रभावी पणे आपले विचार मांडले व प्रथम क्रमांक प्राप्त केला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. सुभाषजी गुप्ता, अध्यक्ष, श्री. समर्थ शि.प्र.मंडळ, आष्टी व प्रमुख पाहुणे श्री.मोहन तुळशिरामजी खारकर मुख्याध्यापक जि.प. उम्र प्राथमिक शाळा, लहान आर्वी व श्री. उमेशभाऊ देशपांडे सचिव समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी व इतर शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. निधी लांडगे हिने यशाचे श्रेय हुतात्मा स्मारक समिती आष्टी संस्था अध्यक्ष श्री. भरत ली. वनझारा, सचिव श्री विनायक मा. होले ,उपाध्यक्ष श्री किशोर रा. गजीवाले आणि समस्त सन्माननीय व्यवस्थापकीय पदाधीकारी तसेच मुख्याध्यापिका सौ. शारदा सं. ढोले,उपमुख्याध्यापिका सरोज राऊत,तसेच शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी वआई वडील यांना दिले.

रामलल्ला जन्मभूमी अयोध्या नगरीत प्रभू रामाची मूर्ती प्राणप्रतिष्ठापणा सोहळ्याच्या निमित्ताने ठचउउ कोचिंग क्लासेसच्या वतीने विद्यार्थ्यांना वृक्ष वाटप.

दै,जनप्रभात उपसंपादक राठोड रमेश पंडित



लातूर / प्रतिनिधी, दिनांक २१ जानेवारी २०२४. श्रीराम जन्मभूमी अयोध्या नगरीत श्री रामलल्ला मुर्ती प्राणप्रतिष्ठापणा सोहळ्याच्या निमित्ताने रोहिणी मॅडम कोचिंग क्लासेसच्या डायरेक्ट रोहिणी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष वाटप केले. अयोध्येत प्रभू रामचंद्राचे भव्य मंदिर व्हावे हे हजारो वर्षांपासून भारतवासी यांनी पाहिलेले स्वप्न २१ जानेवारी २०२४ रोजी सत्यात उतरत आहे.यानिमित्ताने देशातच नव्हे तर जगभरात मोठा आनंद उत्सव साजरा होत आहे, या आनंदी सोहळ्यात ठचउउ रोहिणी मॅडम कोचिंग क्लासेस ने विद्यार्थ्यांना सहभागी करत विद्यार्थ्यांना वृक्ष वाटप केले, या निमित्ताने एक वृक्ष श्रीराम चरणी असे ठचउउ कोचिंग क्लासेसच्या डायरेक्ट रोहिणी मॅडम यांनी यावेळी व्यक्त केले, विद्यार्थ्यांना निसर्गा बद्दल चे प्रेम निर्माण व्हावे या उद्देशाने वृक्ष वाटप केले आहे असे क्लासेसच्या डायरेक्ट रोहिणी मॅडम यांनी यावेळी सांगितले या कार्यक्रमासाठी वैशाली सुर्यवंशी मॅडम, रणजीत बिजलवाड सर, रुद्र बिजलवाड आदी सह विद्यार्थी उपस्थित होते.

विकासकामांत योगदान देणाऱ्या पत्रकारांचे कौतूक करायला आखडता हात कांस्लग

दै,जनप्रभात वर्धा / प्रतिनिधी



प्रत्येक कार्यक्रमातच पत्रकारांना उपदेशाचे डोस पाजण्यात कोणीही आखडता हात घेत नाही. पत्रकारांनी समाजाच्या विकासकामात योगदान द्यावे, आदी सल्ल्याचा पाऊसच पाडल्या जातो. पण समाजसेवकांनी केलेल्या कामांना पत्रकारच प्रसिद्ध देतो. यातून ते विविध पुरस्कारांचे मानकरी ठरतात. नेत्यांनी केलेल्या विकासकामांनाही पत्रकारच प्रसिद्धी देतात. पण त्याच पत्रकारांना उपदेशाचे डोस पाजण्याचे काम पत्रकारदिनाच्या कार्यक्रमात केले जाते. ज्यांना समाजकार्याबद्दल शासनाने पुरस्कार दिले त्यांच्या कामांना पत्रकार भरभरून प्रसिद्धी देत असताना त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याकरीता पत्रकारदिनाच्या कार्यक्रमातच आखडता हात घेणे वेदनादायी असल्याचे रोखठोक प्रतिपादन व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य अध्यक्ष अनिलजी म्हस्के यांनी वर्ध्यात पत्रकारदिनाच्या कार्यक्रमात केले. वर्धा जिल्हा व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने नालवाडीच्या देशमुख लॉनमध्ये पत्रकारदिनाच्या अत्यंत आखीव रेखीव नियोजनबद्ध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यानिमित्त पत्रकारांकरीता कार्यशाळाही आयोजित केली होती. हा कार्यक्रम स्मरणीय ठरला तो व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य अध्यक्ष अनिल म्हस्के यांच्या रोखठोक भूमिकेने तसेच आयबीएन लोकमतचे दिल्लीचे पत्रकार प्रशांत लिला रामदास यांच्या अनुभवसिद्ध भाषणाने.या कार्यक्रमात व्हॉईस ऑफ मीडिया 'वर्धा दर्पण', 'वर्धा दीप', 'वर्धा रक्षक', 'वर्धा उद्यम युवा उद्योजक' व 'वर्धा बालरंग' तसेच पत्रकारिता क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल जिल्ह्याच्या आठही तालुक्यातील २८ उत्कृष्ट पत्रकारांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के पाटील होते. उद्घाटक म्हणून पाटोदा येथील आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील उपस्थित होते. याप्रसंगी दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ अभ्युदय मेघे, न्युज-१८ लोकमतचे ब्युरो चीफ प्रशांत लिला रामदास, वैद्यकीय जनजागृती मंचाचे अध्यक्ष डॉ सचिन पावडे, व्हॉईस ऑफ मीडियाचे विदर्भ अध्यक्ष मंगेश खाटीक, राज्य उपाध्यक्ष प्रकाश कथले, विभागीय उपाध्यक्ष नरेंद्र देशमुख, प्रमोद राऊत, व्हॉईस ऑफ मीडियाच्या साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष वरुण पांडे, सरचिटणीस अनुपकुमार भार्गव प्रामुख्याने उपस्थित होते. पाटोडाचे सरपंच भास्कर पेरे पाटील यांनी त्यांच्या लहानशा गावात केलेल्या विकासकामांचे नियोजन सांगितले तसेच निश्चयाने केलेला गावाचा विकास नेहमीच यशस्वी होतो, असे स्पष्ट केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार हरीभाऊ वझूरकर यांना व्हॉईस ऑफ मीडियाचा 'वर्धा दर्पण' सन्मान, समाजसेवक महेश गुल्हाणे यांना 'वर्धा दिप' सन्मान, पोलीस दलातील सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक संजय देवरकर यांना 'वर्धा रक्षक' सन्मान, महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय कला उत्सवातील उल्लेखनीय कामगिरीसाठी सक्षम धानकुटे नामक बालकलाकारास 'वर्धा कलारंग' उत्कृष्ट बालकलावंत सन्मान तर सेलू येथील समाजसेवक तथा युवा उद्योजक वरुण दफ्तरी यांना 'वर्धा उद्यम' युवा उद्योजक सन्मानाने मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. पान २ वर

जनावराची वाहतूक करणारा ट्रक हिंगणघाट पोलिसांच्या ताब्यात

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपुर



समुद्रपुरः- काल दिनांक २७/०१/२४ रोजी गुप्त माहिती दराकडून माहिती मिळाली की आजंती शिवाराकडून एक ट्रक एन.एच. ४४ रोडवर जनावर भरून येत आहे. अशा माहितीवरून हिंगणघाट पोलीस स्टेशनचे पोलीस स्टॉप पो. उप.नी. रमेश कुमार मिश्रा, पोहवा नरेंद्र डहाके, प्रवीण बोधाने. पो. का. भूषण भोयर, संदीप उईके, महेंद्र गायकवाड, दीपक हाके असे घटनास्थळी रवाना होऊन सदर ट्रकला ताब्यात घेऊन सदर ट्रक मध्ये असलेले काळा रंगाचे एकूण मशीन १६ कि.. प्रति म्हैस १५,००० हजार रुपये ऐकून २४०००० रु व ट्रक किंमत १२,००,००० रू.... असा एकूण किंमत १४,४०,००० रू च्या माल आरोपी नामे १) सोनाभाई शेनेमा २) हरेश शेंनमा दोन्ही राहणार पाटण गुजरात. ३) जुनेद कुरेशी ४) मोहम्मद राहील कुरेशी ५) अब्दुल करीम कुरेशी ६) फैजान कुरेशी. सर्व राहणार हिंगणघाट यांचे कडून ताब्यात घेऊन त्यांचे विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्री नुरूल हसन सा. मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्री सागर कवडे सा.मा.उपविभागीय पोलीस अधिकारी हिंगणघाट श्री. रोशन पंडित सा .यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री मारोती मुळूक ठाणेदार हिंगणघाट याचे निर्देशा प्रमाणे पिळ रमेशकुमार मिश्रा ,पोहवा नरेंद्र डहाके, प्रवीण बोधाने, पो. कॉ. संदीप उईक, भूषण भोयर, महेंद्र गायकवाड, दीपक हाके यांनी केली .

संपादकीय .....

आरक्षण हवे सगळ्यांनाच!

मराठा समाजाची आरक्षणाची मागणी ही ४० वर्षे जुनी आहे, असे सांगितले जात असले तरी अलीकडच्या काही वर्षांमध्ये या मागणीने जास्त जोर धरला. त्यासाठी शांततापूर्ण वातावरणात राज्यभर ५८ मोर्चे निघाले. शेवटचा मोर्चा हा आझाद मैदानात झाला. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. तेव्हा मराठा समाजाला आरक्षण देण्याचा अध्यादेश त्यांनी काढला, पण पुढे ते आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकू शकले नाही. त्यामुळे मराठा समाजात पुन्हा नाराजी पसरली. त्यानंतर काय होणार अशी परिस्थिती असताना काही महिन्यांपूर्वी आंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी सक्रिय असलेले मनोज जरांगे-पाटील यांनी आमरण उपोषण सुरू केले.सुरुवातीला राज्य सरकार त्या आंदोलनाची फारशी दखल घेत नव्हते. पण तिथे आंदोलन करणारे आंदोलन आणि पोलीस यांच्यामध्ये चकमक उडाली. त्यानंतर शांततापूर्ण मार्गाने चाललेल्या या आंदोलनाला राज्यभरात हिंसक रूप आले. त्यात मोठ्या प्रमाणात जाळपोळ करण्यात आली, त्यात लोकप्रतिनिधींची घरे जाळण्यापर्यंत आंदोलकांची मजल गेली. यापूर्वी शांततेत मोर्चे काढणार्या आंदोलकांची इथपर्यंत मजल का गेली याचाही विचार होण्याची गरज आहे. पोलीस आणि आंदोलक यांच्यात जी चकमक उडाली, ते एक निमित्त होते. आपल्याला आरक्षण मिळेल या आशेने मराठा समाजाचे शांततेत ५८ मोर्चे निघाले होते. पण त्यातून काही साध्य होत नाही, असे दिसल्यावर मनात जी खदखद होती, त्याचा विस्फोट झाला. पुढे मनोज जरांगे-पाटील यांच्या मराठा आंदोलनावरून ज्या राज्यभर विविध सभा झाल्या त्याला जो उदंड प्रतिसाद मिळाला, त्यातून या कोंडलेल्या भावना दिसून आल्या. त्यातूनच पुढे मराठा समाजाला कुठल्याही प्रकारे आरक्षण मिळायला हवे, सरकारने काही करून मार्ग काढावा, ही भावना मनात घेऊन जरांगे-पाटील यांनी आंतरवाली सराटी ते आझाद मैदान असा मोर्चा काढायचे ठरवले. त्याला जो काही प्रचंड प्रतिसाद मिळाला, ते पाहून राज्य सरकारला ठोस पावले उचलणे गरजेचे होते.मनोज जरांगे-पाटील यांनी काढलेल्या मोर्चाचे स्वरुप इतके विराट होते की, तो मोर्चा जर मुंबईत आला असता तर अगोदरच गर्दीने भरलेल्या मुंबईचा श्वास बंद होण्याची वेळ आली असती. त्यामुळे तो मोर्चा मुंबईच्या बाहेर थांबवून तिथेच मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा आरक्षणाविषयी केलेल्या मागण्या राज्य सरकार मान्य करत आहे, अशा स्वरुपाच्या प्रारुप अधिसूचनेचे पत्र स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नवी मुंबईतील शिवाजी चौकात जाऊन जरांगे यांना दिले. मुख्यमंत्री शिंदे यांनी मराठा आरक्षणाची मागणी मान्य केली म्हणून लाखोंच्या संख्येने सजलेल्या मराठा आंदोलकांनी गुलाल उधळून आंनदोत्सव साजरा केला. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्रे देण्यात यावीत, अशी जरांगे यांची मागणी असली तरी राज्यातील सगळेच मराठे स्वत:ला कुणबी म्हणवून घ्यायला तयार नाहीत.मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे, अशी त्यांची मागणी आहे. त्यासाठी मराठा समाजातील लोकांचा सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणा तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोग काम करत आहे. त्यामुळे जरांगे यांच्या आंदोलनाला जे यश मिळाले आहे, ते राज्यातील सगळ्याच मराठा समाजातील लोकांना मान्य आहे का, हाही एक गुंतागुतीचा प्रश्न आहे. जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली जो मोर्चा आला, त्यांच्या मागण्यांचे समाधान करण्यासाठी सरकाराने जो मसुदा तयार केला आहे, त्यामुळे राज्यातील ओबीसी समाजावर अन्याय होणार आहे. आम्ही त्याविरुद्ध लढणार आहोत, असे ओबीसींचे नेते छगन भुजबळ यांनी जाहीर केले आहे. जसा मोर्चा मराठा समाजाने काढला तसा आम्ही काढू, असे राज्यातील ओबासी नेते म्हणत आहेत.आरक्षणाचा मूळ हेतू हा समाजातील आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास राहिलेल्या लोकांना समान संधी मिळून सामाजिक समानता निर्माण व्हावी, हा होता. या मागासांमध्ये प्रामुख्याने जातीय मागासांचा समावेश होता, पण काळ जसा पुढे सरकत गेला तशी परिस्थिती बदलत गेली. सुरुवातीला आपल्या जातीय श्रेष्ठत्वाच्या अभिमानामुळे जातीय मागासांव्यतिरिक्त कुणी आरक्षण घ्यायला तयार नसत. कारण आपण आरक्षण घेतले की, खालच्या जातीचे गणले जाऊ असे अनेकांना वाटत होते. पण पुढे लोकांना आरक्षणाचे फायदे जसे दिसू लागले, मिळणार्या सवलती दिसू लागल्या, तसा जातीय ताठरपणा सौम्य होऊ लागला, कारण शेवटी सगळ्याचे मूळ हे शेवटी आर्थिक असते.कारण खिशात पैसा नसेल तर सगळेच गणित बिघडते. मंडल आयोगामुळे अगोदर ओबीसींना आरक्षण मिळाले. त्यानंतर जशी काही वर्षे पुढे सरकली तशी मोठ्या संख्येने असलेल्या मराठा समाजातील लोकांनाही लक्षात आले की, आपणही शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागे पडत आहोत. त्यामुळे जातीय मोठेपणा बाजूला ठेवून त्यांनीही रस्त्यावर उतरून मोर्चे काढले. त्यांनाही आता काहीही करून आरक्षण हवे आहे. आता उरला महाराष्ट्रातील ब्राम्हण समाज. समाजासाठी आर्थिक महामंडळ स्थापन करून आमच्यात जे मागे पडले आहेत, त्यांना पुढे आणावे, अशी सरकारकडे ते मागणी करत आहेत. त्यामुळे आता आरक्षण सगळ्यांनाच हवे आहे, ते कसे द्यायचे हे कुठल्याही पक्षाच्या केंद्र आणि राज्य सरकारपुढे आव्हान आहे.

तहसिल कार्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

पंढरपूर, (प्रतिनिधी):- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दिनांक २५ जानेवारी राज्यासह देशभरामध्ये राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात येतो. राज्यातील नागरीकांमध्ये मतदार नोंदणी तसेच मतदानाच्या महत्त्वासंदर्भात जागरुकता निर्माण व्हावी म्हणून या दिवशी देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, या अनुषंगाने १४ वा राष्ट्रीय मतदार दिवस तहसिल कार्यालय पंढरपूर येथे साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन प्रांताधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी गजानन गुरव व तहसिलदार तथा सहा. मतदार नोंदणी अधिकारी सुशिल बेल्हेकर यावेळी कार्यक्रमास नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, निवडणूक नायब तहसिलदार वैभव बुचके,महसूल सहाय्यक राजेश शिंदे, तहसिलचे उमेश भोसले, कर्मवीर भाऊराव पाटील महाविदयालय, स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, उमा महाविदयालय आणि विवेकवर्धिनी महाविदयालय या महाविदयालयांचे प्राध्यापक व विदयार्थी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितीतांना राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उत्कृष्ट काम करणा-या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, महाविदयालये यांना प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. त्यांचबरोबर उपस्थितीतांना राष्ट्रीय मतदार दिवसाची शपथ घेतली. मतदार दिना निमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली तहसिल कार्यालय येथून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात आली. या रॅलीत विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.

२५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघात १३ हजार ५९५ मतदारांची वाढ २५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघात दि. ६ जानेवारी २०२३ ते ५ जानेवारी २०२४ या कालावधीत एकूण १३ हजार ५९५ मतदारांची वाढ झाली आहे. यामध्ये १८ ते १९ वयातील ४ हजार २९१ मतदार तर २० ते २९ वयातील ६ हजार ७७८ मतदारांची नोंद झाली आहे. तसेच मयत, दुबार आणि कायमस्वरुपी स्थलांतरीत झालेल्या एकूण १५ हजार ४५० मतदारांची वगळणी करण्यात आली आहे. दुरुस्ती, स्थलांतर आणि ओखळपत्रासाठी प्राप्त झालेल्या एकूण ९ हजार ९५३ मतदारांची दुरुस्ती करण्यात आली आहे. २३ जानेवारी २०२४ रोजी अंतीम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. यामध्ये १ लाख ८१ हजार ६४९ पुरुष मतदार तर १ लाख ६९ हजार ८१९ स्त्री मतदार तसेच इतर २३ मतदार असून एकूण ३ लाख ५१ हजार ४९१ मतदार आहेत.

नवीन मतदान नोंदणी, स्थलांतरीत मतदार तसेच दुरुस्ती आणि नवीन ओळखपत्रासाठी अर्ज केलेल्या सुमारे २६ हजार नागरीकांना मतदान ओळखपत्र पोस्टाव्दारे वितरीत करणेत आले आहे. ज्या पात्र नागरीकांची,युवक-युवतींची नावे मतदार यादीत नाहीत त्यांनी त्यांचे भागासाठी नियुक्त केलेल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेकडे नमुना नंबर ६ चा अर्ज भरून दयावा असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी गजानन गुरव व सहा. मतदार नोंदणी अधिकारी सुशिल बेल्हेकर यांनी केले आहे.



ग्रामीण भागातील सुशिक्षीत बेरोजगार यांना राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत मैत्री प्रशिक्षण

सोलापूर (प्रतिनिधी):- केंद्रशासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने राज्यातील ग्रामीण भागातील सुशिक्षीत बेरोजगार यांना राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत मैत्री (Multipupose tificial Insemination Woke In Rual India (MAITRI) म्हणून प्रशिक्षण दयावयाचे आहे. व प्रशिक्षीत व्यक्तिची कृत्रिम रेतन व अनुषंगीक कार्य करण्यासाठी नियुक्ती करावयाची आहे. जेणेकरुन राज्यातील गायी - म्हशीमध्ये कृत्रिम रेतनाची व्याप्ती वाढेल व ग्रामीण भागातील सुशिक्षीत बेरोजगार यांना रोजगार उपलब्ध होईल. तसेच त्यायोगे दुग्ध उत्पादनात वाढ होवुन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यास मदत होईल. सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा ३ महिने कालावधीचा असून यामध्ये एक महिना क्लासरुम ट्रेनींग व २ महिने प्रॅक्टीकल ट्रेनिंगचा समावेश राहील. क्लासरुम ट्रेनिंग पशुवैद्यकिय महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येईल व प्रॅक्टीकल ट्रेनींग जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ किंवा तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय किंवा जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय या ठिकाणी घेण्यात येईल.हे प्रशिक्षण घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जदार हा किमान १२ वी उत्तीर्ण झालेला असावा. त्याचे वय १८ ते ३५ वर्ष असावे.अर्जाचा नमुना पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध होईल.सदर प्रशिक्षण घेण्यासाठी ईच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जदार हा किमान १२ वी उत्तीर्ण झालेला असावा, त्याचे वय १८ ते ३५ वर्ष असावे. अर्जाचा नमुना पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध होईल. सोलापूर, जिल्हयाकरिता सर्वसाधारण प्रवर्गातुन व अनुसुचित जाती प्रवर्गातुन असे एकुण ३५० उमेदवारांची सदर प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येईल.तरी इच्छुक उमेदवारांनी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती यांचेकडे अर्ज सादर करावा असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, डॉ. एस. सी. बोरकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी , डॉ. एन. एल. नरळे केले आहे.

राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने स्वामी विवेकानंद युवा संघटन तर्फे आगरगावं येथे ग्राम स्वच्छता अभियान

देवळी /तालुका प्रतीनिधी किरण राऊत

राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने स्वामी विवेकानंद युवा संघटन तर्फे आगरगावं येथे ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले विवेकानंद युवा संघटनातील युवकांनी विवेकानंद यांच्या विचाराने प्रेरित होऊन गावात विवेकांनद आणि जिजाऊ माता यांची जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमला सरपंच सौ विभाताई राऊत यांनी प्रतिमेचे पूजन केले आणि वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवक व युवती विचार मंच चे तालुका प्रवक्ते संकेत हांडे यांनी विवेकानंदाचे विचारांची तरुणांना गरज आहे व त्याचे महत्त्व सांगितले . जिजामाता महान कार्य सांगितले कार्यक्रमाला उमेश इंगोले उमेश कोरडे व गावातली ज्येष्ठ नागरिक होते जयंती निमित्त ग्राम स्वच्छता अभियान राबवून विनम्र अभिवादन केले विवेकानंदांनी युवकांसाठी देशासाठी काम करावे समाजकार्यात सक्रिय राहून देशभक्ती करावी या विचाराने प्रेरित होऊन आगरगाव तील विवेकानंद युवा संघटनातील शाश्वत भोगे विशाल पिंगे भूषण बारहाते सोहन भोयर रोहन रामटेके ओम कांबळे दर्शन नागोसे संकेत हांडे युवकांनी ग्राम स्वच्छता अभियान राबविले





पी आर पाटील पॉलिटेक्निक येथे खुला रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन



तळेगाव शामजी पंत

. मराठा शिक्षण संस्थाडरा संचालित पी. आर. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक अँड टेक्नॉलॉजी, तळेगाव (शा.पं)येथे खुला रोजगार मेळावा दिनांक २३ जाने.२०२४ला सकाळी १० वाजता पी.आर. पाटील शैक्षणिक संकुल, तळेगाव शामजी(पंत),तालुका आष्टी, जिल्हा वर्धा येथे आयोजित करण्यात आला. या मेळाव्यामध्ये पॉलिटेक्निकच्या जवळपास ३५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली.या मेळाव्यामध्ये बजाज ऑटो लिमिटेड,पुणे या नामांकित कंपनीमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात आली.या मेळाव्याचे आयोजन पॉलिटेक्निक च्या विद्यार्थ्यांना रोजगार संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने करण्यात आले होते.ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांनी व पालकांनी रोजगार मेळाव्याला भरपूर प्रतिसाद दिला व मेळावा यशस्वीरित्या पार पडला.महविध्यालयामधे या प्रकारचे रोजगार मेळावे सतत आयोजित केले जातात.अश्या आयोजणांमुळे पॉलीटेकनिक च्या शेकडो विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला आहे. उत्कृष्ट शिक्षण,विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व रोजगार प्राप्ती यामुळे पी.आर.पाटील पॉलीटेकनिक कडे विद्यार्थि व पालकांचा ओढा वाढतच आहे.महविद्यालयामधे सिव्हिल,कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल व मेकेनिकेल इंजीनिअरिंग या शाखा आहेत. संस्थेच्या या उपक्रमाबद्दल संस्थेवर प्रेम करणाऱ्या पालकांनी समाधान व्यक्त केले. सदर मेळाव्याच्या यशस्वी आयोजन करीता मराठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री.दिलीप भाऊ निंभोरकर,प्राचार्य श्री अतुल ठाकरे,कंपनीचे अधिकारी श्री.अतिशसिंग ठाकूर,महाविद्यालयाचे प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी प्रा. तुषार खोडके,समन्वयक प्रा.करण शहा,प्रा.रोशन नासरे,प्रा.अमित घोरमाडे तसेच संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.





कपील ठाकूर महाराष्ट्र शासनाच्या गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्काराने

पान १ वरुन सन्मानित करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक नुरुल हसन, उपजिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम उपस्थित होते. ठाकूर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल आमदार दादाराव केचे, उपमुख्यमंत्री स्विस सहाय्य सुमित वानखेडे, माजी आमदार अमर काळे, ग्रामीण विकास संस्थेचे सचिव डॉ राहुल कन्नमवार, गर्जना सामाजिक संघटनेचे अध्यक्ष महेश ठाकूर, कन्नमवार विद्यालयाचे मुख्याध्यापक हिराचंद रेवतकर, भाजपा शहर अध्यक्ष्य राहुल गोडबोले व शहरातील सर्व क्रीडा प्रेमी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी वृंद यांनीअभिनंदन केले.

विकासकामांत योगदान देणऱ्या पत्रकारांचे कौतूक करायला आखडता हात कांस्लग

पान १ वरुन यासोबतच जिल्ह्यातील उत्कृष्ट पत्रकारांच्या कार्याचा देखील सन्मान करण्यात आला. यात वर्ध्यातील हितवादचे नरेंद्र देशमुख, झी २४ तासचे मिलिंद आंडे, नीलेश पिंजरकर, वृणाल ढोक, चैतन्य जोशी, सेलू तालुक्यातील लोकमतचे प्रतिनिधी प्रफुल्ल लुंगे, नवभारतचे अभयकुमार बेदमोहता, पुण्यनगरीचे संजय धोंगडे, नवराष्ट्रचे यशवंत वांदिले, तरुण भारतचे भास्कर पिहुल, आर्वी तालुक्यातील प्रमोद एडाखे, नजीर खान, अँड दिलीप ठाकरे, देवळी तालुक्यातील समीर शेख, नरेश ढोकणे, प्रकाश झांजडे, चंद्रशेखर भेंडे, किरण राऊत, कारंजा तालुक्यातील प्रा. अरुण फाळके, प्रा. प्रदीप झुटी, चेतन काळे, रामकृष्ण उर्फ बाबाराव अंबुलकर, सुधाकर बोबडे, हिंगणघाट तालुक्यातील डॉ. रमेश लोंढे, प्रमोद जुमडे, अनिल कडू, महंम्मद रफीक, मलक महंमद नईम आदी पत्रकार बांधवांना शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. दुपारच्या सत्रात पत्रकारांसाठी विशेष कार्यशाळा देखील आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष किशोर कारंजेकर, सचिव एकनाथ चौधरी, जिल्हा प्रवक्ता संजय धोंगडे, सेलू तालुका अध्यक्ष सचिन धानकुटे, उपाध्यक्ष भारत घवघवे, देवळी तालुका अध्यक्ष गणेश शेंडे, हिंगणघाट तालुका अध्यक्ष रवी येणोरकर, आर्वी तालुका अध्यक्ष राजू डोंगरे, पंढरी काकडे, संजय बोंडे, मनिष शर्मा, आनंद धामणकर, अविनाश नागदेवे, सचिन पोफळी, राजू कोहळे, आशिष इझनकर, मंगेश काळे यांनी अथक परिश्रम घेतले. पत्रकार दिन सोहळ्याला शहरातील तसेच ग्रामीण भागातील पत्रकार, राजकीय मंडळीसह अनेकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

न्यू शालिमार मोबाईल शॉपी आणि एंटरप्राइजेस उद्घाटन संपन्न

दैनिक जनप्रभात परभणी प्रतिनिधी अरविंद कांबळे

पूर्णा, शहरामध्ये न्यू शालिमार मोबाईल शॉपी आणि एंटरप्राइजेस चे उद्घाटन मोठ्या थाटात संपन्न. दुकानचे मालक फारूक सेट वडील फजलुन रहमान सहाब त्यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. पूर्णा शहरात एका छताखाली कुलर ,वॉशिंग मशीन, एस सी, होम थेटर, इलेक्ट्रिकल वस्तू, तसेच सर्व कंपन्यांचे मोबाईल योग्य दरात मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे न्यू शालिमार मोबाईल शॉपी आणि इंटरप्राईजेस आंबेडकर चौक पूर्णा , ता, पूर्णा जिल्हा परभणी शहरातील तसेच ग्रामीण भागातील नागरिकांनी एक वेळेस भेट देऊन याचा लाभ घ्यावा असे आवाहन दुकान मालक फारुक शेठ यांनी केले आहे.



सुराज्य निर्माण सेनेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पदी अमर एकाड तर युवक प्रदेशाध्यक्ष पदी सरगम माने यांची निवड

दै,जनप्रभात उपसंपादक / राठोड रमेश पंडित

इंदापूर:- महाराष्ट्र राज्यामध्ये सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून अनेक शेतकरी हितासाठी आंदोलन केले आहेत , सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्या घराला घेराव आंदोलन सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून करण्यात आले. शेतक-यांच्या हिता करिता शेतकरी पेन्शन लागू करा म्हणून मा.आ. रामहरी रूपनवर यांच्या कडे सुराज्य निर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष आकाश दादा पवार यांनी लेखी निवेदन देऊन भेट घेतले होते अशा अनेक प्रकारचे आंदोलन आकाश दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली केले आहेत. सरगम माने यांची निवड करत असताना आकाश पवार बोलताना म्हणाले की , ''सरगम माने हा युवक एम.पी. एस.सी करणारा एक हुशार माझा सहकारी मित्र आहे '' ज्या मित्रांनी शेतकरी संघटना (रघुनाथ पाटील) यांच्या संघटनेमध्ये युवक आघाडी प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे , सरगम माने यांच्या माध्यमातून अनेक ऊस दर आंदोलन व उस हक्क परिषद आयोजित केल्या असून शेतकरी व युवकांच्या हिताकरिता काम केले आहे म्हणून त्यांना युवक आघाडी च्या प्रदेशाध्यक्ष पदी त्यांची निवड करण्यात आली आहे ,सुराज्य निर्माण सेनेच्या महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षपदी अमर जालिंदर एकाड यांची निवड बारामती येथे सुराज्य निर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष आकाश दादा पवार यांनी केले आहे . निवड करतेवेळी आकाश पवार बोलताना म्हणाले की , सुराज्य निर्माण सेना प्रणित सुराज्य विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडली आहे . सुराज्य विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून अनेक नागरिकांना व विद्यार्थी यांना त्यांच्या हक्कांची शिष्यवृत्ती रक्कम मिळवून देण्यास त्यांनी प्रयत्न केले , असून ते त्यांना मिळवून दिले आहे. विद्यार्थी व नागरिकांच्या न्याय हक्कासाठी लढत असतात. प्रशासनामध्ये त्यांची पकड घट्ट आहे. शेतकऱ्यांचा व मराठी माणसांच्या हिता करिता ते येथुन पुढच्या काम करत राहतील असे बोलून त्याच्या निवडी बद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे व अमर एकाड पत्रकारांना बोलताना म्हणाले की , सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून अनेक आंदोलने व उपोषणे केली आहेत , विद्यार्थी यांच्या न्याय हक्कासाठी सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून विधीमंडळात स्व.भारत नाना भालके यांच्या माध्यमातून सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता व त्यावर कारवाई झाले होते येणाऱ्या काळामध्ये सुराज्य निर्माण सेनेच्या ब्रीदवाक्या प्रमाणे संघटन संघर्ष यश या सुत्रांनुसार पक्ष वाढीसाठी काम करणार असून महाराष्ट्र राज्यामध्ये जिल्हाध्यक्ष नियुक्ती करण्यात येणार असल्याचे माहिती नव नियुक्त अध्यक्ष अमर एकाड यांनी पत्रकारांना दिली. व तसेच माने बोलताना म्हणाले की सुराज्य निर्माण सेना युवक आघाडी च्या माध्यमातून महाराष्ट्र भर युवक आघाडी चे जाळे निर्माण करून सुराज्य निर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष आकाश दादा पवार यांची हात बळकट करण्यासाठी काम करणार असून येणाऱ्या काळामध्ये युवकांच्या बेरोजगारीचा प्रश्न , लोणी एम.आय.डी.सी मध्ये भुमिपुत्रांना संधी न देता तालुक्या बाहेरील लोकांना नोकरीचे संधी दिली जाते,नवीन रोजगार निर्मिती चा प्रकल्प येत नसल्यामुळे,युवकांना एम.पी.एस.सी व यु.पी.एस.सी अभ्यास करण्यासाठी अभ्यासिका नाहीत,युवा शेतकऱ्यासाठी कृषी मार्गदर्शन केंद्र नाहीत, स्वयंरोजगारासाठी संधी उपलब्ध करून दिले जात नाही अशा अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रामुख्याने सहकारी साखर कारखाने साठी काम करणार असल्याचे माहिती माने यांनी यावेळी दिले.



लोहा न.पा.च्या प्रगणांत जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण सोहळा मोठ्या थाटात संपन्न

खा. प्रतापराव पाटील चिखलीकरांनी मारली नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्यावर कौतुकाची थाप पुढील पाच वर्षांत ही आपलीच सता

दै, जनप्रभात लोहा प्रतिनिधी/ विश्वनाथ शिंदे.

संपुर्ण लोहा शहर व तालुका वासियांचे लक्ष वेधून घेतलेल्या क्रांतिसूर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या सोहळ्याचा कार्यक्रम मोठ्या थाटात व उत्साहात संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून खा. प्रतापराव पाटील चिखलीकर होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोहा न. पा. चे लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी प्रमुख पाहुणे म्हणून शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे सर, माजी नगराध्यक्ष कल्याण सावकार सुर्यवंशी , प्रवीण पाटील चिखलीकर,काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस संजय भोसीकर, शिवसेनेचे बाळासाहेब पाटील कराळे, बसव बिग्रेडचे अविनाश भोसीकर, शिवसेनेचे लोहा –कंधारचे नेते बाळासाहेब पाटील कराळे, माजी जिल्हा परिषद सदस्य हंसराज पाटील बोरगावकर शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण,, यांच्या सह धर्म गुरू आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी प्रथम ढोल ताशांच्या गजरात, फुलांची सजावट व उधळण करीत फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करीत जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरणाचे उद्घाटन खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सत्काराचा कार्यक्रम झाला.यावेळी बोलताना खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्यावर कौतुकाची थाप मारली व विरोधकांची बोलती बंद केली.यावेळी पुढे बोलताना खा. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, आजचा दिवस ज्या पध्दतीने २२ जानेवारी रोजी देशवासीयांनी जशी मोठी दिवाळी साजरी केली तशी लोह्यात दिवाळी साजरी केली असे म्हटले तर वावगे ठरू नये.मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी जो मुंबईत लढा दिला त्याला यश आले व इकडे नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांना महात्मा बसवेश्वर महाराज यांचा पुतळा बसविण्यासाठी यश आले.नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी जाहीरनाम्यात जे – जे प्रश्न होते अजिंठ्यावर ते सोडविण्याचे काम केले. आब की बार ४५० पार असा भाजपाचा नारा आहे. देशाचे नेते पंतप्रधान यांच्या हस्ते आयोध्या येथे श्रीराम मंदिरांचे काम झाले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे ही अभिनंदन करतो त्यांनी जरांगे पाटील यांचे उपोषण सोडले . कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला हात न लावता आरक्षणाचा प्रश्न सोडविला. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांचे कौतुक केले पाहिजे त्यांनी दोन दिवसांत महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुतळ्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून मान्यता घेतली. कुठल्याही महामानवाचा सन्मान करण्याची आपली संस्कृती आपण जपत आलो व जपली पाहिजे . नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी ५ वर्षात अतिशय चांगले काम केले आहे लोहा वासिय त्यांना आशीर्वाद देतील असे खा. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले.तसेच यावेळी नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी बोलताना म्हणाले की, लोहा शहरातील जनतेने भाजपाचा नगराध्यक्ष व १३ नगरसेवक निवडून दिले. सर्व सभागृहाना सोबत घेऊन विकास कामे केली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचा प्रश्न १५ ते २० वर्ष होता पण मी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांचे काम पूर्ण केले आहे लवकरच त्यांचे सुशोभीकरण करण्यात येईल. लिंबोटी धरणाचे पाणी लोहा शहराला मिळावे म्हणून पाणी पुरवठ्याचे काम केले. शहरातील सर्व सभागृहांचे काम केले बडेसाब दर्गा व मुस्लिम स्मशानभूमीचे काम केले, देवणेवाडी येथे सभागृह रस्त्याचे कामे केली, स्वामी समर्थ महाराज सभागृह, शिवकल्याण नगर येथे सभागृहासहीत शहरात रस्ते नाली आदी ४० ते ५० कोटी रुपये निधीचे विकास कामे केली.आज खा प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे उद्घाटन झाले हे जाहिर करतो असे



नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी म्हणाले. यावेळी उपाध्यक्ष दता वाले , नगरसेवक केशवराव मुकादम, नगरसेवक बबनराव निर्मले, नगरसेवक करीम शेख, नगरसेवक संभाजी पाटील चव्हाण नगरसेवक अमोल व्यवहारे , नगरसेवक नबीसाब शेख, नगरसेवक संदीप दमकोंडवार, यांच्यासह सर्व नगरसेवक,न. पा.चे , अधिकारी, कर्मचारी, यांच्यासह लोहा शहर व तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरसेवक भास्करराव पाटील पवार यांनी केले तर सुत्रसंचलन विक्रम कदम यांनी केले.

महापुरुषांना अभिवादन करुन प्रजासत्ताक दिन

उत्साहात साजरा कन्हान शहर विकास मंच डरे कार्यक्रमाचे आयोजन



कन्हान :- कन्हान शहर विकास मंच डरे ७५ व्या प्रजासत्ताक दिना निमित्य कार्यक्रमाचे आयोजन गांधी चौक येथे करण्यात आले . कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित मंच मार्गदर्शक प्रभाकर रुंघे , ताराचंद निंबाळठर यांचा हस्ते महात्मा गांधी , लाला बहादुर शास्त्री , डॉ बाबासाहेब आंबेडकर , महात्मा ज्योतिबा फुले , शहिद भगत सिंह यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली . यावेळी शहर विकास मंच संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर , प्रदीप बावणे , संजय तिवसकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करुन प्रजासत्ताक दिना च्या शुभेच्छा दिल्या .

तिरंगा झेंडाला सलमी देऊन राष्ट्रगीत गायन करुन कार्यक्रमाची सांगता करीत प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात थाटात साजरा करण्यात आला .या प्रसंगी कन्हान शहर विकास मंच संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर, मार्गदर्शक प्रभाकर रुंघे , ताराचंद निंबाळकर , प्रदीप बावने , भुषण खंते , संजय तिवसकर , हरीओम प्रकाश नारायण , प्रकाश कुर्वे , अनुराग महल्ले , कृणाल राजपूत ,सुजल यादव , अमन यादव , ओम यादव , शाहरुख खान , सचिन यादव , नितिन मेश्राम सह आदि मंच सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते .

वाहनचालकांच्या टाळूवरचे लोणी खाणारे सरकार – संघर्ष ग्रुप संस्थापक अध्यक्ष संजय हाळनोर

दै.जनप्रभात पिंपरी चिंचवड शहर प्रतिनिधी/ गोरक्ष मदने

पिंपरी चिंचवड शहर :-जय संघर्ष वाहन चालक सामाजिक संघटनेने पुणे जिल्ह्यातील इंदापूर जवळ हिंगणगाव येथे २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी दुपारी एक वाजता पुणे सोलापूर हायवे बंद करून केंद्र सरकारचा जाहीर निषेध केला ,भारतातील दळवरण ही आज मुख्य व्यवस्था मानली जाते द ळ ण व ळ ण असो प्रवाशांची वाहतूक असो किंवा मालवाहतूक असो यासाठी वाहनांचा वापर केला जातो मात्र या वाहनांसाठी चालक म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती अहोरात्र मेहनत करून प्रवाशांना सुरक्षित त्यांच्या घरी पोहोचवण्याचे काम करतात मात्र त्यांना मुबलक प्रमाणात मानधन मिळत नाही ,त्यांना सुरक्षा देण्याऐवजी सरकार कडून त्यांच्या विरोधात हिट अँड रन सारखे कायदे अमलात आणले जात आहेत, त्या पार्श्वभूमीवर जय संघर्ष संस्था प्रणित जय संघर्ष वाहन चालक मालक संघटनेच्या वतीने हिंगणगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले त्यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री संजय हाळनोर यांनी वाहनचालकांच्या टाळूवरचे लोणी खाणारे हे सरकार आहे अशा कडवट शब्दात सरकारवर टीका केली, तसेच वाहन चालक सुरक्षा कायदा अमलात आणा व वाहन चालकांसाठी आर्थिक महामंडळ स्थापन करा त्यानंतर हिट अँड रन या कायद्यात आर्थिक दंड व दहा वर्षाचा कारावास कमी करून मगच या कायद्याची अंमलबजावणी करावी असे निवेदन तहसीलदार साहेबांना देण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन पुणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष श्री विनोद मखरे तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री गोरक्ष मदने ,महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष आप्पासाहेब तोडकर, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अतिश सोनवणे, पुणे जिल्हा अध्यक्ष संतोष जाधव ,पुणे जिल्हा प्रभारी अध्यक्ष विशाल शेवाळे, पुणे जिल्हा सल्लागार संदीप खारकर ,पुणे जिल्हा अध्यक्ष अवजड विभाग त्रिंबक मस्के, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सुनील शिंदे, अहमदनगर जिल्हा अध्यक्ष महिला विभाग शुभांगी ताई अजय घनवट, अजय घनवट ,पिंपरी चिंचवड शहर अवजड विभाग अध्यक्ष गोरख कदम, उपाध्यक्ष दत्ता पाटील, सचिव अमोल चव्हाण ,चाकण शहर अध्यक्ष राजेश जाधव ,विलास काळुंखे, रवींद्र अंमल, राहुल सोनवणे, संतोष जेजुरकर, धनाजी पोळ ,अश्रू मोहिते ,आजिनाथ ओव्हाळ ,युवराज जाधव ,दिवाकर आल्हाट, बाळासाहेब हजारे, समीर शेख ,आधी संस्थेचे पदाधिकारी व सदस्य या आंदोलनात सहभागी होते,



लोकशाहीचे सक्षमीकरण: श्रीमती किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसी, कामठी डरे मतदार जागरूकता अभियान

दै.जनप्रभात :- दिनांक २५ जानेवारी २०२४ ला श्रीमती किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसी, कामठी येथील राष्ट्रीय सेवा योजना ईकाई डरे राष्ट्रीय मतदार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी जवळच्या गादा गावात मतदार जनजागृती मोहिमेचे आयोजन केले. या मोहिमेत सुमारे १०० स्वयंसेवक सहभागी झाले. विद्यार्थ्यांच्या स्वयंसेवक गटाने नुक्कड नाटक सादर केले ज्याने मतदानाचे महत्त्व दर्शवले आणि गावकऱ्यांवर प्रभाव टाकला. विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावात रॅली काढली आणी गावकर्यांशी संपर्क करून मतदानाचे महत्त्व समजावून ग्रामस्थांना मतदानासाठी प्रेरित केले. कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ मिलिंद उमेकर व समन्वयन रासेयो अधिकारी प्राध्यापक मयूर काळे आणि प्राध्यापिका सुप्रिया शिधये यांनी केले. स्वयंसेवकांनी गावकऱ्यांमध्ये मतदानाच्या महत्त्वाचा संदेश पोहोचवल्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला.

आयुष भारत डॉक्टर्स असोशियन डरा कार्यशाळेचे आयोजन

दै.जनप्रभात विरुळ आकाजी–

मंगळवार दि ३०/१/२४ ला सिद्धिविनायक मंगल कार्यालय पंचधारा रोड पुलगाव येथे सकाळी ११ वाजता आयुष भारत डॉक्टर्स असोसिएशनचे विदर्भ व मराठवाड्यातील पहिले सेमिनार चे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.श्री अमिर मुलानी(राष्ट्रीय अध्यक्ष),कार्यक्रमाचे उदघाटक डॉ. सौ. साक्षी सुतार राष्ट्रीय कार्याध्यक्ष,मार्गदर्शक श्री एस एन सुतार,तसेच कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर डॉ विश्वास वाघमारे,डॉ विनायक मेथे,डॉ विनोद देशमुख, डॉ आनंद भोसले, डॉ दिनकर निसाळकर,डॉ बाळासाहेब सोरेकर,डॉ मनीषा ताई गुरव,डॉ परमजीत सिंग,डॉ युवराज शिंदे,डॉगणेश पाटील, डॉ जयसिंग दुर्गाणावर,डॉ नितीन जाधव,डॉ ज्योती धावरे,डॉ राजेंद्रकुमार नवले,डॉ ज्योती सिरसाट इत्यादी व प्रमुख पाहुणे मान्यवर मोठ्या प्रमाणा त उपस्थित राहणार आहे.महाराष्ट्रातील अल्टरनेटीव, नॅचरोपॅथी, इलेक्ट्रो होमिओपॅथी, लीा ए यांना प्रॅक्टिस मध्ये येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी तसेच सर्व डॉक्टरांच्या हितासाठी विदर्भ व मराठवाड्यातील पहिले राज्यस्तरीय सेमिनारचे आयोजन केलेले आहेत. तरी राज्यातील या सेमिनारला उपस्थित राहून सेमिनारचा लाभ घ्यावा. असे आवहान विदर्भ अध्यक्ष डॉ विनोद देशमुख आयुष भारत डॉ असो.यांनी केले आहे.

पत्रकार विनोद महाजन व सचिन देवताळे ग्रामपंचायत विरूळ कडुन सन्मानित..

विरूळ आकाजी





प्रजासत्ताक दिनी विरुळ येथील शासन व प्रशासनामध्ये उत्कृष्ट सहभाग व विकासात्मक सहकार्य केल्याबद्दल विरुळ येथील पत्रकार सचिन देवताळे व विनोद महाजन यांचा काल ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने शाल श्रीफळ व मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.शासन व प्रशासनामध्ये उत्कृष्ट सहभाग व विकासात्मक सहकार्य केल्या बद्दल विविध मान्यवरांच्या उपस्थितीत येथिल पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.प्रजासत्ताक महोत्सव २०२४ या कार्यक्रमा अंतर्गत विविध सामाजिक राजकीय बांधवांचा गौरव करण्यात आला.सरपंच दुर्गा प्रसाद मेहरे, प्रशांत नागोसे, प्राचार्य बाळसराफ, उपसरपंच नितिन पोलकडे, पोलिस पाटील निरज तुरके, महेंद्र बुराडे ,ग्रामविकास अधिकारी खंडागळे सुरेखा ठाकुर व विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते

चांदुर बाजारच्या जगदंबा क्रीडा मंडळाने उंचावला ''नमो चषक''

उत्तर प्रदेशसह राज्यातील चामुंचा कबड्डी स्पर्धेत सहभाग,दहेगाव येथे प्रेक्षणीय सामन्यांची

दै.जनप्रभात देवळी शहर प्रतिनिधी नितीन चांदेकर,

स्व.विष्णुपंतकाका केळकर व स्व.प्रभाकरराव गावंडे यांच्या स्मूर्ती प्रित्यर्थ नूतन स्पोटिंग क्लब व सेवा फौंडेशन पुलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य ''नमो चषक'' कबड्डी स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा पार पडला,या सामन्याचे आयोजन श्री.गौरवजी गावंडे यांनी केले,त्यावेळी प्रामुख्याने उपस्थित वरून पाठक जिल्हाध्यक्ष भाजयुमो मंगेश झाडे अध्यक्ष सेवा फौंडेशन पुलगाव, नंदू झोटिंग तालुका अध्यक्ष भाजपा, हेमचंद रंगारी, .विनय मोरे, सुधाकर गावंडे, गजानन दूतारे, वैभव श्यामकुवर सरपंच लोणी, गजानन हिवरकर उपसरपंच मुरदगाव (खोसे),अक्षय खोब्रागडे , प्रशांत तुमडाम , शकिलभाई,आशिष भालकर,चंदु बेले,विकास टाले,वसंता राऊत,मोरेश्वर कांबळे ,अरुण डुकरे. सुभाष चिखलकार,सतिष मेटकर, देवू दुबे, कार्यक्रमाचे आयोजक गौरव गावंडे उपस्थित होते,त्यावेळी प्रथम पुरस्कार जगदंब क्रीडा मंडळ चांदूर बाजार, दुत्तीय पुरस्कार यमाजी स्पोटिंग क्लब अंदोरी, तुतीय पुरस्कार युपी योद्धा, चतुर्थ पुरस्कार जय क्रांती क्रीडा मंडळ मलकापूर तसेच वयक्तिक पुरस्कार सुद्धा देण्यात आले, त्या वेळी खेळाडू विवेक गावंडे,मंगेश पाटील,आशिष गावंडे,अक्षय गावंडे,प्रज्वल बोरकर,



लोकेश दरने,संदीप नानवटकर, आदित्य गावंडे,शिवम चिखलकार, तुषार भलावी,रोशन चौधरी,पवन गावंडे,लक्ष्मण चौधरी,सुधीर राऊत,राहुल सातपुते,प्रतीक गावंडे,साहिल उईके,वैभव चौधरी,ओम गावंडे,प्रणय येसनकार,मानव माजरखेडे,ऋषीकेश माजरखेडे,शुभम माजरखेडे,रसिक खोब्रागडे, प्रांजल गावंडे,यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.

राजीव गांधी निवासी मूकबधिर विद्यालय

पुलगाव येथे भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा

विरुळ आकाजी

आज राजीव गांधी निवासी मूकबधिर विद्यालय पुलगाव येथे भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव माननीय श्री. रविंद्रजी कोटंबकार, प्रमुख पाहुणे श्री. गौतम सांगोले, मनोज जिंदे तसेच शाळा प्रमुख श्री महेंद्र जाधव यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण केले. तसेच मा. श्री. रविंद्रजी कोटंबकार यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर मूकबधिर विद्यार्थ्यांची कवायत घेण्यात आली. त्यानिमित्ताने मा. श्री. रविंद्रजी कोटंबकार यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन अजय वानखडे व आभार प्रदर्शन प्रशांत नासरे यांनी केले कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



७५ वे गणतंत्र दिवस का अमृत महोत्सव ब्रह्मा कुमारी विद्यालय में मनाया गया



दै.जनप्रभात

७५ वे गणतंत्र दिवस का अमृत महोत्सव ब्रह्मा कुमारी विद्यालय में मनाया गया कामठी प्रजापिता ब्रह्मा कुमारी विद्यालय शाखा रनाला में ७५ वें गणतंत्र दिवस का अमृत महोत्सव कार्यक्रम आयोजित किया गया जिसमे ब्र. कु. प्रेमलता दिदीजी ने अपने उद्बोधन में कहा की २६ जनवरी १९५० से भारत देश में संविधान लागू किया गया जिसे आज ७५वर्ष पूर्ण हूये हैं। जिसका ही आज पुरा देश अमृत महोत्सव मना रहा है। भारत के वीर स्वातंत्र्य सेनानीयों और संविधान तयार करने वाले महान विभुतीयों को आज शत शत नमन और प्रणाम करते है क्योंकी उन्होंने ही आज के दिन को साकार होने का सपना देखा था और आज हम सब भारतवासी बडे उमंग के साथ हर उत्सव मनाते है। गणतंत्र दिवस हमारा राष्ट्रीय त्योहार हैं इस दिन पर सभी को हार्दिक हार्दिक बधाई हो....कार्यक्रम मे आये संयुक्त धर्म संसद महाराष्ट्र के प्रदेश संयोजक श्री राजेश शर्मा जी ने भी गणतंत्र दिवस की शुभ कामनाए दी। महादेव घाट योगासन ध्यान केन्द्र के अध्यक्ष और सचिव श्री महेन्द्र वाही और मोंटू भुटानी जी ने भी अपनी शुभ कामनाए दी। बाद में ध्वजारोहण किया गया

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

दै.जनप्रभात तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपूर समुद्रपुरः-

तालुक्यातील मांडगाव येथील माजी आमदार मा. सुरेशभाऊ देशमुख यांचे अमृत महोत्सव निर्मिती यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था वर्धा डरा संचालित यशवंत विदयालय व कनिष्ठ महाविद्यालय, मांडगाव. ता. समुद्रपूर, जि. वर्धा डरा आयोजित संस्कृतीक कार्यक्रम घेण्यात आला.बापूराव देशमुख उर्फ दाजी व सावित्राबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलित करून उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यशवंत विदयालय व कनिष्ठ महाविद्यालय मांडगाव व अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्था, बोथुडा यांच्या संयुक्त





विद्यमाने गुणवंत विद्यार्थीचा सत्कार करण्यात आला. एस. एस. सी. बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांक कुमारी रुचिका प्रमोद पिसे ८०.८०%, द्वितीय क्रमांक कुमारी समीक्षा ज्ञानेश्वर प्रधान ७५.४०% व तृतीय क्रमांक कुमारी कल्याणी क्षीरसागर भगत ७५.२०% मिळालेत तसेच एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांक पल्लवी अंबादास बावणे ७५%, द्वितीय क्रमांक कुमारी सानिका राऊत ७४% व तृतीय क्रमांक सुहाणी लिलेश पिसे ७३% या मुलींनी मिळवलेत यांना प्रमाणपत्र, मुमेंट, मेडल देऊन सत्कार करण्यात आला. कलागुणांना वाव देणे यासाठी यशवंत विदयालय व कनिष्ठ विदयालय मांडगाव येथे विविध स्पर्धा राबविण्यात आल्या त्यात निबंध, वक्तृत्व, क्रिकेट, प्रश्नमंजुषा, डान्स, नाटिका यात भाग घेतलेल्या मुला-मुलींना प्रमाणपत्र शाळेच्या व संस्थेच्या वतीने देण्यात आले.यशवंत विदयालयाचे मुख्याध्यापक मा. नितीन लोहकरे सर, मांडगावचे सरपंच सौ. सुरेखाताई जोगे, प्रमुख अतिथी मा. सतीश जगताप, सामाजिक कार्यकर्ते मा. सुरेशभाऊ डांगरी, अनिल देशमुख भाऊ व वसंतराव आंबटकर अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रोशन नवघरे, सचिन प्रमोद कुडमते तसेच सदस्य हर्षल तांदुळकर, सुरज नवघरे तसेच शाळेतील शिक्षक गण कर्मचारी यांनी कार्यक्रमाला सहकार्य केले व कार्यक्रमाची शोभा वाढवली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळसराफ सर यांनी केले व कार्यक्रमाचे संचालक येवले मॅडम आभार प्रदर्शन मुते सर यांनी केले.

कपील ठाकूर महाराष्ट्र शासनाच्या गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्काराने सन्मानित

दैं.जनप्रभात
सन्मानित आर्वी :-

मागील अनेक वर्षापासून जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात एक उत्कृष्ठ क्रीडा प्रशिक्षक म्हणून ठसा उमटविणारे कन्नमवार विद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक कपिल ठाकूर यांना प्रजासत्ताक दिनानिमित्य जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते सन्मानचिन्हसह रोख रकम देवून सन्मानित करण्यात आले. कपील ठाकूर हे मागील ३० वर्षापासून कन्नमवार विद्यालय येथे क्रीडा प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहे. प्रशिक्षक कपील ठाकूर यांनी आर्वी तालुक्यातील विविध वयोगटातील व्हॉलीबॉल खेळाडूंना मार्गदर्शन करून जिल्हा, विभाग, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यामागे मोलाचा वाटा राहाला. प्रशिक्षक म्हणून काम करीत असतांना त्यांच्या मार्गदर्शनात अनेक खेडाळू राज्यस्तरावर पाहचले तर ५७ खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. शालेय वयोगटातील खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत कन्नमवार विद्यालयाला नावलौकिक मिळून देण्यात ठाकूर यांचा सिंहाचा वाटा आहे. हे बघता स्थानिक शासकीय अधिकाऱ्यानी यांच्या कार्याची दाखल घेत यांना तालुका क्रीडा मार्गदर्शक म्हणून जवाबदारी दिली. हि जवाबदारी सांभाळत असतांना त्यांनी विविध शाळेतीलअनेक खेळाडू घडविले. हेच नव्हे तर अनेक खेळाडू खेळाच्या माध्यमातून शासकीय सेवेत रुजू झाले. सातत्याने अनेक वर्षापासून क्रीडा क्षेत्रातअसंख्य खेळाडू घडविणारे ठाकूर यांच्या कार्याची दखल घेत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते रोख रकमेसह सन्मान चिन्ह व पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक नुरुल हसन, उपजिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम उपस्थित होते. ठाकूर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल आमदार दादाराव केचे, उपमुख्यमंत्री स्विस सहाय्य सुमित वानखेडे, माजी आमदार अमर काळे, ग्रामीण विकास संस्थेचे सचिव डॉ राहुल कन्नमवार, गर्जना सामाजिक संघटनेचे अध्यक्ष महेश ठाकूर, कन्नमवार विद्यालयाचे मुख्याध्यापक



हिराचंद रेवतकर, भाजपा शहर अध्यक्ष्य राहुल गोडबोले व शहरातील सर्व क्रीडा प्रेमी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी वृंद यांनीअभिनंदन केले.

राणी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय सावरगाव येथे प्रजासत्ताक दिन साजरा

दैं.जनप्रभात
नरखेड प्रतिनिधी

२६ जानेवारी २०२४ला राणी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय सावरगाव येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला.ध्वजारोहण माजी कृषी सभापती जिल्हा परिषद नागपूर सतीश शिंदे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अजय करकरे, राणी लक्ष्मीबाई ज्युनिअर कॉलेज, सावरगाव चे माजी प्राचार्य प्रभु गायकवाड,जेष्ठ नागरिक वसंतराव पाणतावणे यांची उपस्थिती होती. त्यानंतर सामूहिक राष्ट्रगीत व झेंडा गीत सादर करण्यात आले. सोबत महात्मा गांधींच्या व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनात सतीश शिंदे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी आपल्या जीवनात स्वतंत्र भारताचे महत्त्व काय आहे हे लक्षात आणून दिले व सर्वांनी आपल्या देशाला प्रगतीपथावर न्यावे असे मत स्पष्ट केले.कार्यक्रमाला महाविद्यालयाचे डॉ. राजेश्री कडू,डॉ रंजना लांजेवार, डॉ. चंद्रशेखर क्षिरसागर,डॉ. रेवाराम मालखेडे, डॉ.सिध्दार्थ पाटील,विजय गांजरे,आशीष रेवतकर,बालू पाणतावणे , सुरेश बोरडे,श्रीमती सुनीता नाईक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुमुद चारमोडे यांनी केले तर कार्यक्रमाचे आयोजन शारीरिक शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांनी केले.



कळंब ग्रामपंचायत मधील वार्ड नं.०३ मधील १७५ अनुसूचित जाती मधील वंचित मतदारांना न्याय मिळवून देणार - आकाश पवार

दैं.जनप्रभात उपसंपादक / राठोड रमेश पंडित

इंदापूर:- मौजे कळंब तालुका इंदापूर जिल्हा - पुणे प्रभाग क्र. ३ मधील नऊदारे या ठिकाणी सुमारे १७५ अनुसूचित जातीच्या मतदारांना २०२१-२२ पंचवार्षिक ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये मतदानापासून तत्कालीन तहसीलदार सोनाली मेटकरी यांनी जाणीवपूर्वक वंचित ठेवल्याबद्दल तात्काळ चौकशी करून कारवाई करण्याची मागणी सुराज्य निर्माण सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अमर एकाड यांनी राधाकृष्ण विखे पाटील महसूलमंत्री यांच्याकडे केली आहे. सदर निवेदन तात्काळ कार्यवाहीसाठी महसूल मंत्री कार्यालयास ऑनलाईन रित्या ए - ६६११२५३ पाठविण्यात आले आहे . त्यावरती सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून हा विषय महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन सुराज्य निर्माण सेनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अमर एकाड यांनी दिले आहे. ब-याच दिवसांपासून अनेक संघटना व पक्ष मौजे कळंब ता.इंदापूर जि.पुणे प्रभाग क्रमांक ०३ मधील नऊदारे या ठिकाणी सुमारे १७५ अनुसूचित जाती च्या मतदारांना २०२१-२२ पंचवार्षिक ग्रामपंचायत निवडणुकी मध्ये मतदानापासून तत्कालीन तहसिलदार सोनाली मेटकरी यांनी जाणीवपूर्वक वंचित ठेवल्याबद्दल तत्काळ करून कारवाई करण्यात यावी यासाठी २०२१ पासून आज पर्यत भांडत दि.२५/०१/२०२४ रोजी सुराज्य निर्माण सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अमर एकाड यांनी मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना लेखी स्वरूपात पत्र व्यवहार केला आहे या प्रकरणी दोषी असणा-या अधिकारी व हे करायला लावणा-या पुढा-यांना हया गोष्टीचे किंमत मोजावी लागेल,प.पु.बोधीसत्व डॉबाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला लोकशाही राज्य घटनेडरे बहाल केले. लोकशाही चा राजा मतांच्या पेटीतून जन्माला येईल..अशी संविधान सांगत असते ,१७५ मतदारांना त्याच्या लोकशाही च्या माध्यमातून दिलेल्या मतदानापासून वंचित ठेवण्यात आले...याचा अर्थ असा होतो की लोकशाही हे धोक्यात आहे पण आम्ही असं होऊ देणार नाही यासाठी लढा उभा करू अशी माहिती सुराज्य निर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष आकाश पवार यांनी यावेळी पत्रकारांना दिली आहे व ते म्हणाले की,लोकांनी



लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही असते,परंतु पुढा-यांनी त्यांच्या स्वार्थासाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही अशी व्याख्या सध्या कळंब ग्रामपंचायत हद्दीतील पुढा-यांनी व लोकप्रतिनिधी यांनी केलेले दिसते.

उदगीर किल्यावर प्रजासत्ताक दिनी ध्वजवंदन

दैं. जनप्रभात उपसंपादक / राठोड रमेश पंडित

उदगीर:- २६ जानेवारी २०२४ वर्ष ' हिंदवी स्वराज्या ' चं ३५० वर्ष अनोख्या व अभिनव उपक्रमांनी आणि उत्साहवर्धक 'शिवप्रतिज्ञा ' नी मोठ्या उत्साहात पार पडला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेकाला ३५० वर्ष पुर्ण होत असल्याने यानिमित्ताने २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्रातील ३५० गड-किल्ले गडकोटावर व मराठवाडयातील सर्व किल्यांवर भारतीय राष्ट्रध्वज व स्वराज्याचा केसरी जरी पटका ध्वज फडकवण्याचा राष्ट्रीय कीर्तीमान प्राप्त गिर्यारोहक तथा अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष उमेश झिरपे, इतिहास अभ्यासक, शासन गड संवर्धन समिती सदस्य, लेखक, पत्रकार संकेत कुलकर्णी, कार्यवाह डॉ.राहुल वारंगे, ठीहळकेश यादव, गिर्यारोहक महासंघ पदाधिकारी श्रीमती दीपाली भोसले, एव्हरेस्टवीर रफीक शेख व महासंघाच्या संकल्पा उपक्रमाअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील व मराठवाडयातील दुर्गाप्रेमी, शिवप्रेमी व्यक्ती व संस्था महाराष्ट्रातील ३५०



किल्यांवर शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून तिरंगा व भगवा ध्वज फडकविण्याचा ठाम विश्वास व निर्णयानुसार उदगीरच्या भोईकोट किल्यावर ध्वजवंदन करून शिवछत्रपतींना अभिवादन करण्यात आले.यावेळी वंदन मातृभूमी प्रतिष्ठान परिवाराने आज दि.२६ जानेवारी २०२४ शुक्रवार रोजी उदगीर किल्ला येथे अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघ व वंदन मातृभूमी प्रतिष्ठान परिवार यांच्यातर्फे उदयगिरी महाराज मंदिर परिसरामध्ये शिवप्रेमींनी भगवा ध्वज व तिरंगा शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा व भारत मातेच्या प्रतिमेचे माजी सैनिक संदीप रोडगे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी भारतीय प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारोह नियमाप्रमाणे तालुकादंडाधिकारी तथा तहसीलदार रामेश्वर गोरे यांच्या हस्ते उदगीर किल्ल्यावर तिरंगा ध्वजारोहण झाला. याप्रसंगी माजी सैनिक संदीप रोडगे यांनी तहसीलदार रामेश्वर गोरे यांना अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघ आणि वंदन मातृभूमी प्रतिष्ठान परिवारांच्या वतीने २६ जानेवारी या दिवशीच्या कार्यक्रमाची माहिती व कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. यावेळी ऋषीकेश चौसष्टे, गणेश स्वामी, सागर रोडगे, स्वप्निल ममदापुरे, गोविंद रंगवाळ, पत्रकार संजय शिंदे, दलितमित्र बालासाहेब शिंदे अतनूरकर, सामाजिक कार्यकर्ते बी.जी.शिंदे उपस्थित होते. यावेळी शिव-प्रतिज्ञा घेण्यात आली.

उमरखेड येथे भव्य नोकरी महोत्सव आयोजन

दैनिक जनप्रभात उमरखेड प्रतिनिधी
लखन जाधव।

उमरखेड तालुक्यातील अनेक युवक शिकून बेरोजगार आहेत हिंगोली लोकसभा खासदार हेमंत पाटील यांच्या वतीने उमरखेड येथे भव्य नोकरी महोत्सव चे आयोजन उमरखेड येथे आयोजन करण्यात आले होते यावेळी उमरखेड तालुक्यातील किनवट तालुक्यातील अनेक युवकांनी रोजगार मेळावा ला येऊन मुलाखती दिल्या यावेळी हिंगोली लोकसभा खासदार हेमंतभाऊ पाटील गोदावरी समूह अध्यक्षा राजश्री ताई पाटील भारतीय जनता पार्टी चे यवतमाळ वाशिम लोकसभा नेते नितीनभाऊ भुतडा मा जिल्हा परिषद सदस्य चितांगराव कदम सर यांनी परिसरातील युवक युवतींना मोलाचे मार्गदर्शन दिले यावेळी संतोष जाधव कल्याणराव पाटील मिराशे कपिल पाटील चव्हाण संदीप ठाकरे अनेक जनाची प्रमुख उपस्थिती होती यावेळी परीसरातील अनेक गावातील हजारो युवकांनी मुलाखत दिल्या आणि याच ठिकाणी कंपनी कडून निवड पत्र देण्यात आले



रामटेक तालुक्याअंतर्गत मौजा देवलापार येथे संत ताजुद्दीन बाबा यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमाला माजी मंत्री श्री.राजेंद्र मुळक यांची उपस्थिती.

दैनिक जनप्रभात
जयश्री मेंघरे रामटेक

दिनांक २७/०१/२०२४ रोज शनिवारला रामटेक तालुक्यातील मौजा देवलापार येथे संत ताजुद्दीन बाबा यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमाला मा.श्री. राजेंद्रजी मुळक (माजी मंत्री तथा अध्यक्ष नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी) यांनी उपस्थिती दर्शवली. दरम्यान संत केक कापून संत ताजुद्दीन बाबा यांचा जन्मदिवस साजरा केला व त्यांचे दर्शन घेतले.यावेळी सौ. सारिकाताई उइके (सरपंच ग्रा.पं. देवलापार), श्री.रामरतन गजभिये (सदस्य ग्रा.पं. देवलापार), कु. मोनिकाताई पोवरे (सदस्य ग्रा.पं. देवलापार), श्री.कैलास निघोट, श्री. हाफीजभाई शेख, श्री. मोतीराम खंडाते, श्री. मोहसीन पठाण, श्री संदीप इनवते, श्री. अशोक पारखी, श्री. आशिष





पठाण, श्री. सलमान पठाण, श्री. आरिफ पठाण, श्री. उस्मान पठाण आदी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साहूर येथे ग्रामगीता जीवन विकास परीक्षा संपन्न परीक्षा केंद्र श्री ज्ञानेश्वर कनिष्ठ महाविद्यालय साहूर

दैं.जनप्रभात

साहूर :-अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज मोझरी अंतर्गत घेण्यात येणारी ''ग्रामगीता जीवन विकास परीक्षा'' साहूर येथील श्री ज्ञानेश्वर विद्यामंदिर तथा कनिष्ठ महाविद्यालय येथे घेण्यात आली असून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.श्री ज्ञानेश्वर विद्यामंदिर व श्री ज्ञानेश्वर कनिष्ठ महाविद्यालय साहूर येथे आज अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ,गुरुकुंज आश्रम त्यांचे आदेशानुसार ग्रामगीता जीवन विकास परीक्षेच्या प्रवेश परीक्षा, परिचय परीक्षा, प्रवीण परीक्षा, ग्रामनाथ परीक्षा व ग्रामगीता रत्न अशा एकूण पाच गटातील विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर येऊन परीक्षा दिली. यात विद्यार्थ्यांशिवाय प्रा. डॉ. तुषार नायकुजी, सामाजिक कार्यकर्त्या नंदा कांदे, नंदा वरकड विद्यार्थी म्हणून परीक्षा दिली. सन १९९६ पासून सातत्याने श्री ज्ञानेश्वर विद्यामंदिर तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने परीक्षा घेण्यात येत असून या केंद्रावरून आजवर किमान ८००० चे वर विद्यार्थ्यांनी ग्रामगीता जीवन विकास परीक्षेत सहभाग नोंदविला आहे.ग्रामगीता जीवन विकास परीक्षेचे तालुका समन्वयक प्राध्यापक विनोद पेठे यांचे मार्गदर्शनात मागील अनेक



वर्षापासून आष्टी तालुक्यात होत असून. याही वर्षी ११ केंद्रावरून सदर परीक्षा घेण्यात आली आहे. सदर परीक्षा केंद्रावर ''गुरुदेव हमारा प्यारा श्र है जीवन का उजीयारा श्र श्र या संकल्पने परीक्षेची सुरुवात करण्यात आली असून परीक्षेनंतर प्रा विनोद पेठे, राष्ट्रीय कीर्तनकार गजानन महाराज भोरे, नंदा कांदे, नंदा वरकड, भास्कर सोनकुसरे आदींनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

उमंग गीताई कॉलेजमध्ये ७५वा प्रजासत्ताक दिन साजरा

दैं.जनप्रभात
कोराडी, दिलीप येवले-

उमंग गीताई कॉलेज ऑफ वूमेन्स एजुकेशन कोराडी रोड, पांजरा नागपूर येथे ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचा संचालिका वैशाली फुले यांचा हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थिनींनी देशभक्तीवर आधारित गित, नृत्य व दमदार भाषणाडरे कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अल्पशा फुले, पंकज उके, स्नेहजित ठाकरे उपस्थित होते. महाविद्यालयाचा संचालिका वैशाली फुले यांनी स्वतःचे उदहारण देऊन मुलींनी स्वावलंबी बनून स्वतःचा स्वयंरोजगार प्रस्थापित करून आपण स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला आधार देऊ शकतो यावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. दुर्गेश वासनिक यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्व विद्यार्थिनींना समजावून दिले व संविधानामुळे आपल्या भारतामध्ये सगळ्या गोष्टी सुरळीतपणे व्यवस्थापित झालेल्या आहेत असे संबोधन दिले. प्रजासत्ताक दिनानिमित्य साक्षी बागडे, राणी ऊईके यांनी भाषण दिले. निधी घाइवान हिने देशभक्ती गित सादर केले. त्यामुळे विद्यार्थिनींनी मध्ये जोश उत्साह वाढला. कार्यक्रमाचे संचालन मेघा लहरे व आभार रक्षा कांबळे हिने केले. कार्यक्रमात सा. प्रा. अश्विन अंजीकर, सा. प्रा मयूर जलवानीया, सा. प्रा. प्रीती मानकर, सा. प्रा. कु. तृप्ती डोंगरे, सा. प्रा प्राची रंगारी, सा. प्रा डॉ. मेरी लुइस, सा.



प्रा मोनाली रामधाम, सा. प्रा प्राची शर्मा, सा. प्रा दीपिका श्रेष्ठा, सा. प्रा ग्रेसी राय, सा. प्रा पूनम सोनाने, सा. प्रा मोहिता जैतावार, पवन करमेले, निलेश मेश्राम, गौरव गावंडे, संगीता चौधरी, तृप्ती टेम्भरे, कीर्ती भोरकर, मधुकर डांगे आजीने परिश्रम घेतले.

****

मल्हारी पवार चा जयाद्री ते आयोध्या सायकल प्रवास सुरू नागपूर मध्ये स्वागत.

दैनिक जनप्रभात
जयश्री मेंघरे रामटेक.....

भक्ती श्रद्धा देश प्रेमी आणि देश ऐक्याच्या संदेश उरी बाळगत हजारो किलोमीटरच्या प्रवास करीत जयाद्री कुशीतील नीरा नदीतीरी वास्तव्यास असलेला रामभक्त देशभक्त सायकलपट्टू मल्हारी पवार जयद्री ते अयोध्या असा सायकल प्रवास सुरू केला असून सांस्कृतिक राजन नागपूर येथे त्याचे नागपूर दिघोरी घाट रोड येथील सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र कोहपरे आणि मंजू आदिराम यांनी स्वागत केले तसेच मल्हारी यांना सहकार्य देखील केले आता तो मध्य प्रदेश मार्गे अयोध्याला रवाना झाला आहे पेशाने कॉन्ट्रॅक्टर असलेल्या मल्हारी किशोर पवार याला सायकल देश प्रवास करण्याच्या लहानपणापासूनच छंद झाला असून आतापर्यंत त्याने ३४ हजार किलोमीटर प्रवास देखील केला आहे त्याच्या या आवडीला आणि देश प्रेमाला परिवाराच्या



खंबीर पाठिंबा देखील आहेत त्याची पत्नी डॉक्टर असून आपला परिवार सांभाळत त्या मल्हारी च्या पाठीमागे महाळसासारख्या उभ्या आहेत यापूर्वी जनजागृतीच्या माध्यमातून त्यांनी संदेश देत राष्ट्रीय एकतेच्या संदेश सायकल प्रवास दरम्यान दिला आहे हे महत्त्वाचे हे मल्हार पवार यांचे विशेष.

वाहतुकीचे नियम तोडाल तर दंडाची पावती मोबाईलवर

संभाजीनगरात चौकाचौकांमध्ये नंबर प्लेट रिकग्निशन कॅमेऱ्यांचे काम सुरू

दैं जनप्रभात छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी मोहन आखाडे

छत्रपती संभाजीनगर शहरात वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे. सिग्नलवर स्टॉप लाईन ओलांडणे, सिग्नल तोडून जाणे, विना हेल्मेट किंवा ट्रिपल सीट प्रवास करणे असे प्रकार सुरू आहेत, पण आता वाहतूक नियमांचा भंग कराल तर तुम्हाला मोबाईलवर दंडाची पावती येऊ शकते. स्मार्ट सिटीअंतर्गत शहरातील मुख्य रस्त्यासंह चौकाचौकांत व सिग्नलवर १२२ ठिकाणी नंबर प्लेट रिकग्निशन कॅमेरे बसण्यात आले असून २६ जानेवारी रोजी या कॅमेऱ्यांचे उद्घाटन करण्यात आले. स्टॉप लाइन ओलांडाल, सिग्नल जम्पिंग कराल, विनाहेल्मेट किंवा ट्रिपल सीट दुचाकी चालवताना कॅमेऱ्यामध्ये चित्रित होताच मोबाइलवरच पावती मिळणार आहे. पोलिस आयुक्तालयातील कमांड ऍंड कंट्रोल सेंटरमध्ये स्वयंचलित कॅमेरे नंबर प्लेट रिकग्निशन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत शहरातील १७ जंक्शनवर १२२ एएनपीआर (ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन) कॅमेरे लावण्यात आले आहेत. पोलिस आयुक्तालयातील कमांड ऍंड कंट्रोल रूममधील ई-चलान प्रणालीशी संलग्न करण्यात आले आहेत. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांचे ऑटोमॅटिक फोटो काढून वाहनावर आणि वाहनधारकावर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली जाणार आहे. या ठिकाणी बसवले कॅमेरे क्रांती चौक, बाबा पेट्रोल पंप, सिडको चौक, शहानूरमियाँ दर्गा चौक, मिल कॉर्नर, समर्थनगर, टी व्ही. सेंटर यासह १७ चौक व महत्त्वाच्या ठिकाणी १२२ कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

****

निवडक महामुंबई

आयरिस ॲनालिसिस टेक्नॉलॉजी मुलांसाठी उपयुक्त

मुंबई : आयरिस ॲनालिसिस टेक्नॉलॉजी जगभरातील मुलांना त्यांच्या क्षमतेनुसार क्षेत्र निवडण्यास मदत करणार आहे. हे तंत्रज्ञान केवळ जगभरातील मुलांचे जीवन सुधारेल. मुंबईत आयोजित कार्यक्रमात आयरिस ॲनालिसिस टेक्नॉलॉजीची माहिती देताना संस्थापक भरत मलिक बोलत होते. संजय गौतम यांनी दीर्घ संघर्षानंतर हे तंत्रज्ञान विकसित करण्यात यश मिळवले आहे. या काळात सुमारे ६० जणांचे बुब्बुळांचे विश्लेषण करण्यात आले. यूएसए सरकारद्वारे मान्यताप्राप्त या तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षण भागीदार, यूएसए बेस एरिया संस्थेच्या संस्थापक आणि मानसशास्त्रज्ञ क्लॉडिया कॉर्डोआ यांनी सांगितले की, या तंत्रज्ञानामुळे माझ्या आयुष्यात बरेच सकारात्मक बदल झाले आहेत. त्याच्या मदतीने, आम्ही अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा भरण्यात यशस्वी झालो आहोत.

मिठाईच्या नावाने ऑनलाईन फसवणूक; ठगाला अटक

मुंबई : मिठाईच्या नावाने ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या सन्जी हानिफ खान या ठगाला राजस्थान येथून डी. बी मार्ग पोलिसांच्या एका विशेष पथकाने अटक केली. यापूर्वी याच गुन्ह्यांत मुफीद चौटल्ली खान याला पोलिसांनी अटक केली होती. ते दोघेही ऑनलाईन फसवणुकीच्या गुन्ह्यांतील सराईत गुन्हेगार असून, ही एक आंतरराज्य टोळी असल्याचे तपासात उघडकीस आले आहे. दरम्यान, अटकेनंतर सन्जी खानला लोकल कोर्टाने पोलीस कोठडी सुनावली आहे. त्याच्या अटकेने ऑनलाईन फसवणुकीचे इतर काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे. २९ सप्टेंबरला तक्रारदार तरुणाने तिवारी स्विट या दुकानातून ऑनलाईन लाडूची ऑर्डर दिली होती. यावेळी समोरील व्यक्तींनी त्यांना ऑनलाईन पेमेंट करण्यास सांगून त्यांच्या बँक खात्याची गोपनीय माहिती प्राप्त करून त्याच्यासह त्याच्या मित्राच्या बँक खात्यातून एक लाख चौदा हजार रुपयांचा अपहार केला होता. हा प्रकार नंतर लक्षात येताच त्यांनी डी. बी. मार्ग पोलिसांत अज्ञात सायबर ठगाविरुद्ध तक्रार केली होती. याप्रकरणी फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा नोंद होताच पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला होता. चौकशीदरम्यान ज्या बँक खात्यात ही रक्कम जमा झाली होती, ते बँक खाते राजस्थानातील एका खासगी बँकेचे असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांनी संबंधित बँक खात्याचे सर्व व्यवहार बंद करण्याची बँकेला विनंती केली होती. या माहितीनंतर पोलिसांचे एक विशेष पथक राजस्थानात पाठविण्यात आले होते. या पथकाने तांत्रिक माहितीवरुन मुफीद चौटल्ली खान याला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते.

६२ लाखांच्या दागिन्यांचा अपहार; गुन्हा दाखल

मुंबई : सुमारे ६२ लाखांच्या दागिन्यांचा अपहारप्रकरणी एल. टी. मार्ग पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा नोंदवून पळून गेलेल्य दोन्ही आरोपींचा शोध सुरू केला आहे. राजू ऊर्फ राजेंद्र बन्सीलाल रावल आणि मधुसुदन शीतल मंडल अशी या दोघांची नावे आहेत. या दोघांनी अशाच प्रकारे इतर काही व्यापाऱ्यांची फसवणूक केली आहे का याचा पोलीस तपास करत आहेत. संदीप सोहनलालजी जैन ज्वेलर्स व्यापारी असून, त्यांचा सोन्याचे दागिने होलसेलमध्ये विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांचे झव्हेरी बाजार येथे एक दुकान आहे. काही महिन्यांपूर्वी त्यांनी मधुसुदनला ३७ लाख २० हजारांचे ६४८ ग्रॅम वजनाचे शुद्ध सोने सोन्याचे दागिने बनविण्यासाठी दिले होते; मात्र त्याने सोन्याचे दागिने न बनविता सोन्याचा अपहार करून पलायन केले होते. हा प्रकार नंतर निदर्शनास येताच त्यांनी मधुसुदन मंडलविरुद्ध एल. टी. मार्ग पोलिसांत तक्रार केली होती. दुसऱ्या घटनेत राजू रावलने कांदिवलीतील एका व्यापाऱ्याची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. अनिल बसंतीलाल पामेचा हे कांदिवली येथे राहत असून, त्यांचा होलसेलमध्ये दागिने विक्रीचा व्यवसाय आहे. दोन वर्षांपूर्वी त्यांची राजूसोबत ओळख झाली होती. त्यांनी २५ लाखांचे ४२५ ग्रॅम वजनाचे दागिने विक्रीसाठी दिले होते; मात्र त्याने या दागिन्यांचा अपहार करून अनिल पामेचा यांची फसवणूक केली होती.

वाढत्या प्रकल्प खर्चावर काँग्रेसचे प्रश्नचिन्ह



मुंबई : मुंबई महापालिकेच्या माध्यमातून विविध प्रकल्प राबवण्यात येत असून अनेक प्रकल्प काम सुरू होण्याआधीच महागले आहेत. ऑरेंज गेट ते ग्रँट रोड उन्नत मार्ग, वरळीतील भूमिगत पार्किंग या प्रकल्पांच्या वाढीव खर्चावरून काँग्रेसने पालिकेच्या कारभारावर सवाल उपस्थित केला आहे. पाच महिन्यांत प्रकल्प खर्च दुप्पट झाला असून, ही निव्वळ मुंबईकरांच्या पैशाची उधळ आहे. कंत्राटदारासाठी पालिकेचे तिजोरीचे दरवाजे उघडले असून, वाढीव खर्चाबाबत पालिकेने योग्य ते स्पष्टीकरण दिले पाहिजे, अशी मागणी केली आहे.

मुंबई महापालिका प्रशासनाने ऑरेंज गेट ते ग्रँट रोड उन्नत मार्गासाठी पुन्हा नवीन काढले आहे. या आधी निविदा काढून ते रद्द केले होते. हा प्रस्ताव आणला तेव्हा त्याचा खर्च ६३८ कोटी इतका होता. वर्षभरात वाढून १,१७० कोटी झाला आहे. अवघ्या ६ महिन्यांत एखाद्या प्रकल्पाची किंमत इतकी कशी वाढते, असा सवाल पालिकेतील माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी केला आहे. प्रशासन यासाठी महागाईचे कारण देत आहे. वरळीतील भूमिगत पार्किंग प्रकल्पाचा खर्च ८ महिन्यात १६५ कोटींवरून २१६ कोटी झाला आहे.

८ महिन्यात ५१ कोटींनी प्रकल्प खर्च कसा वाढतो? पालिका प्रशासन याला महागाईचे कारण देत आहे. म्हणजे पालिकेच्या म्हणण्यानुसार ८ महिन्यात ३१ टक्क्यांनी महागाई वाढली, तर केंद्र सरकार महागाई निर्देशांक ५.४६ टक्के इतका असल्याचे म्हणते आहे. पालिका प्रशासन अवघ्या काही महिन्यांत महागाई दुप्पट झाली आहे, म्हणते तेव्हा प्रकल्प खर्चात ती कशी वाढली, याची माहितीही मुंबईकरांना देणे बंधनकारक आहे. हा मुंबईकरांचा पैसा असून, त्याचा हिशेब मिळायलाच हवा, असे राजा यांनी म्हटले आहे.

बेलगाम कारभारावर निर्बंध आवश्यक

पालिकेच्या मुदत ठेवीत गेल्या वर्षभरात आठ हजार कोटींची घट झाली आहे. हे चिंताजनक आहे. पालिकेकडे सध्या उत्पन्नाचा स्रोत नाही. त्यामुळे विकासकामांसाठी ठेवी मोडल्या जात आहेत. त्यात प्रकल्पांचा खर्च दर सहा महिन्यांत वाढत असल्यामुळे ठेवी मोडण्याचे प्रमाण अधिक आहे. पालिकेत नगरसेवक नसल्यामुळे प्रशासनाला जाब विचारणारे कोणी नाही. त्यामुळे प्रशासनाचा बेलगाम कारभार सुरू आहे. यावर निर्बंध आणायला हवेत, अशी मागणी रवी राजा यांनी केली आहे.

अधिक व्याज देणाऱ्या बँकांमध्ये ठेवींची गुंतवणूक

मुंबई : निवडलेल्या सर्व बँकांकडून दरपत्रिका मागवून अधिक व्याजदर देणाऱ्या बँकांमध्ये यापूर्वी मुदतठेवीची गुंतवणूक करत असे. राज्य सरकारकडून २०१९ मध्ये राष्ट्रीयकृत बँकांच्या १५ टक्के नक्त मूल्यापेक्षा अधिक गुंतवणूक न करण्याच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत; मात्र असे असले तरी पालिकेच्या गुंतवणुकीची एकूण व्याप्ती लक्षात घेता स्पर्धात्मक व्याजदर मिळण्यासाठी ही गुंतवणूक बँकांच्या १५ टक्के नक्त मूल्यापर्यंत न करता राष्ट्रीयकृत बँकांच्या २५ टक्के नक्त मूल्यापर्यंत गुंतवणूक केली जात असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

विकासकामे, कंत्राटदारांच्या अनामत रकमांचा परतावा, बेस्टला देण्यात येत असलेले अनुदान यासाठी गेल्या काही वर्षांत पालिकेच्या मुदतठेवींना प्रशासनाने हात घातला आहे. वर्षभरापूर्वी सुमारे ९२ हजार कोटींवर पोहोचलेल्या मुदतठेवी नोव्हेंबर २०२३ अखेरीस ८४ हजार कोटींवर आल्या आहेत. मुदतठेवीत होणाऱ्या या घटीमुळे राजकीय पक्षांकडून टीका केली जाते आहे. एकीकडे मुदतठेवीत काही प्रमाणात घट झाली असली तरी दुसरीकडे अधिक व्याजदर देणाऱ्या बँकांमध्ये त्या ठेवण्यात आल्याने ठेवींच्या रकमांमध्ये चांगली वाढ होत असल्याचे पालिका प्रशासनाने नमुद केले आहे.

गुंतवणुकीबाबत मुंबई महानगरपालिका

उच्च व्याजासाठी १० हजार कोटी हस्तांतरित

गुंतवणुकीबाबत उच्च व्याजदराचा फायदा घेण्यासाठी अर्थसंकल्प 'अ' कडून अर्थसंकल्प 'ग' कडे एकूण १० हजार कोटींहून अधिक रक्कम हस्तांतरित करण्यात आली आहे, अशी माहिती पालिकेकडून देण्यात आली आहे.

अधिनियम, १८८८ च्या कलम १२२(२) नुसार पालिकेच्या अधिशेष रकमेच्या गुंतवणुकीसाठी स्थायी समितीने २८ जुलै १९९९ रोजी ठराव केला आहे. हा ठराव क्रमांक १२७ आणि २८ सप्टेंबर १९९९च्या ठराव क्रमांक २४६ अन्वये निवडलेल्या सर्व बँकांकडून दरपत्रिका मागवून अधिकतम व्याजदर देणाऱ्या बँकांकडील मुदतठेवीत गुंतवणूक करण्यात येत असे. मात्र २०१२, २०१५ आणि २०१९ च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीयकृत बँकाच्या १५ टक्के नक्त मूल्यापेक्षा अधिक गुंतवणूक न करण्याच्या मार्गदर्शक सूचना पालिकेला देण्यात आल्या आहेत. पालिकेची कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक आणि मिळणारा अधिकचा व्याजदर यामुळे राष्ट्रीयकृत बँकांच्या २५ टक्के नक्त मूल्यापर्यंतच्या दरपत्रिका पाहून अधिशेष रकमेची गुंतवणूक करण्यासाठी पालिका आयुक्तांनी यांनी १५ मे २०२३ अन्वये मान्यता दिली आहे.

मिठीचे पाणी नदीतच रोखणार

२८ फ्लड गेट्स बसवणार; दोन हजार कोटी रुपये खर्च करणार

मुंबई : मिठी नदी शेजारी राहणाऱ्या रहिवाशांना पूरस्थितीचा सामना करावा लागू नये यासाठी मिठी नदीशेजारी फ्लड गेट्स बसवण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. एकूण २८ ठिकाणी फ्लड गेट्स बसवण्यात येणार असून, यासाठी दोन हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. फ्लड गेट्स बसवल्यानंतर मिठी नदीशेजारीला रहिवाशांना पावसाळ्यात मोठा दिलासा मिळणार आहे.

२६ जुलै, २००५ मध्ये मुंबईत ढगफुटी झाली आणि मुंबई पाण्याखाली गेली. शेकडो मुंबईकर महाप्रलयात वाहून गेले, तर कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. ढगफुटीनंतर मिठी नदीतील पाण्याच्या पातळीत वाढ झाली आणि नदी शेजारील परिसर जलमय झाला. या भयावह आपत्कालीन परिस्थितीनंतर मिठी नदीचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय पालिकेने घेतला. मिठी नदीतील सांडपाणी, रसायन मिश्रीत पाणी



रोखण्यासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजनाही केल्या जात आहेत. विहार तलावापासून माहीम खाडीपर्यंत नदी विस्तारली असून, ही नदी अंधेरी, वांद्रे, कुर्ला परिसरातून जाते. त्यामुळे माहीम खाडीपासून सुरू होणाऱ्या भरती-ओहोटीच्या क्षेत्रासह अन्य भागात फ्लडगेट्स बसविण्याचे नियोजन पालिकेचे आहे. या परिसरात फ्लडगेट्स उभारल्याने भरतीच्या वेळेस हे दरवाजे बंद केल्यास नदीतील पर्जन्य जलवाहिन्यांतून पाणी रोखण्यास मदत होईल. ओहोटीच्या वेळेस हे दरवाजे उघडून पर्जन्य जलवाहिन्यांमधील पाणी नदीत जाण्यास मदत होणार आहे. तसेच पाणी ओव्हरफ्लो होऊन रेल्वे रुळांवर जाणार नाही. वाहतूकही सुरळीत राहील. त्यामुळे मिठी नदीवर फ्लडगेट्स बसविण्यात येणार आहे. या फ्लडगेट्समुळे पावसाळ्यात शहरात भरणारे पाणी रोखण्यास याची मदत होणार आहे.

...म्हणून मिठी नदीला नाल्याचे स्वरूप

मिठी नदीच्या एकूण प्रवाहमार्गाच्या परिसरात झोपड्या वसल्या आहेत. या ठिकाणाहून जलप्रवाह, सांडपाणी मिठी नदीत येते. तसेच, मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकसह विविध प्रकारचा कचरा मिठी नदीत टाकला जातो. विविध भागांत कचरा अडकून राहतो. मुसळधार पावसात मिठीला पूरस्थिती निर्माण होते. मुंबईतील सांडपाणी ही मिठी नदीत सोडले गेल्यामुळे या नदीला नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

मालमत्ता चोरी करणाऱ्यांची धरपकड

मुंबई : मुंबई उपनगरीय रेल्वे हद्दीतील मालमत्ता चोरी करणाऱ्यांविरोधात मध्य रेल्वेच्या आरपीएफ टीमने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत रेल्वेची मालमत्ता चोरी करणाऱ्यांविरोधात कायद्याअंतर्गत ५६० जणांवर गुन्हा दाखल केला असून, १,२६२ जणांना अटक करण्यात आल्याचे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले.



प्रवाशांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासह त्यांच्या सुरक्षेचीही जबाबदारी मध्य रेल्वे प्रशासनाची आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मध्य रेल्वेवरील उपनगरीय ट्रेनच्या ४२१ महिला डब्यांत आणि मेल - एक्स्प्रेस ट्रेनच्या १७६२ डब्यांत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे २४ तास पाळत ठेवली जाते. उपनगरीय गाड्यांच्या ५१२ महिला डब्यांमध्ये इमर्जन्सी टॉकबॅक सिस्टीम देण्यात आली आहे.

मध्य रेल्वेवरून विशेषतः रात्री जाणाऱ्या १०९ मेल/एक्स्प्रेस गाड्या आरपीएफ द्वारे एस्कॉर्ट केल्या जात आहेत, २०२३ मध्ये आमच्या सतर्क आरपीएफ जवानांनी ७१ प्रवाशांचे प्राण वाचवले, ११६५ अल्पवयीन मुलांची सुटका केली, ४७५ दलालांना अटक केली आणि ३९९ प्रकरणे नोंदवून १२५८६ तिकिटे जप्त केल्याचे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले.

विनापरवाना होर्डिंग लावणाऱ्यांची खैर नाही

मुंबई महापालिकेचा कायदेशीर कारवाईचा इशारा

मुंबई : उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, मुंबई शहर तसेच पूर्व आणि पश्चिम उपनगरे परिसरातील सार्वजनिक रस्ते तसेच पदपथांवर पूर्वपरवानगीशिवाय होर्डिंग, बॅनर किंवा पोस्टर लावण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मनाई करण्यात आली आहे. नागरिकांनी, सामाजिक संस्थांनी तसेच राजकीय पक्षांनी सार्वजनिक रस्ते, पदपथांवर महानगरपालिकेच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे होर्डिंग, बॅनर तसेच पोस्टर लावू नये, असे आवाहन बृहन्मुंबई महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.

मुंबई महानगरातील अनधिकृत होर्डिंग, बॅनर तसेच पोस्टर काढण्याची मोहीम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुज्ञापन खात्याकडून सातत्याने राबविली जाते आहे. तसेच संबंधितांविरोधात कारवाई



करण्यात येते. नागरिकांनी, सामाजिक संस्थांनी तसेच राजकीय पक्षांनी सार्वजनिक रस्ते, पदपथांवर महापालिकेच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे होर्डिंग, बॅनर तसेच पोस्टर लावू नये, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर अधिकृत जाहिरात फलकांची यादी नागरिकांसाठी प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

वाढीव पगारापासून हजारो कर्मचारी वंचित

मुंबई : सहाव्या वेतन आयोगाने शिफारस केलेल्या वेतन निश्चितीसाठी वेतन विसंगती सुधारणा समितीने दिलेला अहवाल ऑक्टोबर २०२३ रोजी मंजूर होऊन परिपत्रक जारी झाले; मात्र त्यानंतरही अद्याप या निर्णयाची अंमलबजावणी महापालिकेने केलेली नाही. त्यामुळे पालिकेचे हजारो कर्मचारी कर्मचारी वाढीव पगारापासून वंचित राहत आहेत.

वेतन विसंगती सुधारणा समिती अहवालाच्या आधारे उपप्रमुख लेखापालांनी (आस्थापना/२) २३ ऑक्टोबर २०२३ अन्वये परिपत्रक जारी केले. परिपत्रकानुसार नोव्हेंबर २३ पासून वेतनात वाढीव रकमेचा समावेश होणे अपेक्षित होते; मात्र डिसेंबरच्या वेतनापर्यंतही रक्कम जमा झालेली नाही. पालिका प्रशासनाने यापूर्वीची थकबाकीची रक्कम पुढील तीन वर्षांत म्हणजे २०२४ ते २०२६ या वर्षात तीन टप्प्यात द्यायची आहे; मात्र अद्याप वाढीव रक्कम देण्यात न आल्याने कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. सर्व विभागांच्या आस्थापनांनी वेतन निश्चिती करून ठेवली असली, तरी लेखापाल (कोषागार) विभागाकडून आदेश जारी केले जात नाहीत. वरिष्ठांकडून आदेश आले नसल्याची कारणे दिली जात असल्याची माहिती दि म्युनिसिपल युनियनचे रमाकांत बने यांनी दिली.

विटा बनविण्यासाठी दिलेल्या १२३ किलो चांदीचा अपहार

मुंबई : विटा बनविण्यासाठी दिलेल्या ७६ लाख रुपयांच्या १२३ किलो चांदीचा अपहार करून फसवणूक केल्याप्रकरणी एका वयोवृद्ध चांदीच्या व्यापाऱ्याला एल. टी मार्ग पोलिसांनी अटक केली. रमेश बच्चूभाई सतीकुमार असे या वयोवृद्धाचे नाव असून, अटकेनंतर त्याला किल्ला कोर्टाने पोलीस कोठडी सुनावली आहे. लवकरच त्याच्याकडून अपहार केलेले चांदी हस्तगत केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. चांदीचे व्यापारी असलेले मकरंद विक्रम परिहार यांच्या मालकीची एक खाजगी कंपनी आहे. ही कंपनीत मार्केटमधून शुद्ध चांदी घेऊन त्याच्या विटा बनवून होलसेलमध्ये विक्री करतात. चांदीच्या विटा बनविण्याचे काम त्यांची कंपनी रमेश सतीकुमार याच्या कांदिवलीतील हिंदुस्तान नाका, एम. जी. रोडवर असलेल्या एस. व्ही. गोल्ड ॲण्ड सिल्व्हर रिफायनरी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला दिले होते.

घोषणांचा पाऊस, अंमलबजावणी कागदावरच!

फेरीवालामुक्त मुंबईचे रस्ते, पदपथ, फेरीवाल्यांसाठी हक्काचे भूमिगत मार्केट, खड्डेमुक्त रस्ते, दर्जेदार आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा आणि सध्या चर्चेचा विषय म्हणजे स्वच्छ व सुंदर मुंबई अभियान. या घोषणा काही एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर कानी पडतात असे नाही, तर वर्षानुवर्षे अशा घोषणांचा मारा मतदारराजावर होत आहे. कुठलाही राजकीय पक्ष असो निवडणुका जवळ आल्या की, मतदारराजावर घोषणांचा वर्षाव करायचा. परंतु निवडणुकीनंतर घोषणांची अंमलबजावणी कागदावरच असते.

महापालिका दर्पण गिरीश चित्रे

पिण्याचे पाणी, खड्डेमुक्त रस्ते, दुर्गंधीमुक्त मुंबई अन् सृदृढ आरोग्य याच गोष्टी मिळाव्यात हीच करदात्या मुंबईकरांची माफक अपेक्षा, तर दुसरीकडे करदात्या मुंबईकरांचे आम्हीच वाली असा टेंभा सर्वपक्षीय नेते मिरवतात. २४ तास पाणी, कचरामुक्त मुंबई, पालिका शाळांतील शैक्षणिक दर्जा उंचावणे या घोषणा मुंबईसाठी नवीन नाहीत. तरीही निवडणुका डोळ्यासमोर ठेवून घोषणांचा वर्षाव करायचा ही संधी सर्वपक्षीय नेतेमंडळी सोडत नाहीत. मुंबई महापालिकेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता लक्षात घेता सर्वपक्षीय नेतेमंडळींनी सोन्याचं अंडं देणाऱ्या मुंबई महापालिकेवर कब्जा करण्यासाठी कंबर कसली आहे. मुंबई पालिकेच्या निवडणुका जवळ आल्या की, मतदारराजाला आकर्षित करण्यासाठी आश्वासनांचा पाऊस पडायचा यात राजकीय पक्ष धन्यता मानतात. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, खड्डेमय रस्ते, आरोग्याचा बोजवारा, शिक्षणाची ऐसी की तैसी या सगळ्या गोष्टी डोळ्यासमोर असताना फक्त अन् फक्त सत्तेच्या लालसेपोटी राजकीय पक्ष एकमेकांची उणी धुणी काढायची अन् सत्ता स्थापनेसाठी घोषणांचा पाऊस पाडायचा. वर्षानुवर्षे मुंबईकरांचा खड्डेमय प्रवास, पिण्याच्या पाण्यासाठी वणवण, नाल्यातील गाळ नाल्यात, दरवर्षी पावसाळ्यात मुंबईत पूरस्थिती निर्माण होणे या गोष्टींचा आजही मुंबईला सामना करावा लागतो, हे दुर्दैव म्हणावे लागेल.

सन २०२४ निवडणुकीचे वर्ष. लोकसभा, विधानसभा व मुंबई महापालिकेच्या निवडणुका. प्रत्येक निवडणुकीत राजकीय पक्षाचा कसोटीचा काळ असतो. निवडणुकीत विजयाची माळ गळ्यात पडायला पाहिजे, हेच ध्येय मनाशी बाळगत राजकीय पक्ष कामाला लागतात. २०२२ मध्ये शिंदे-फडणवीस यांचे सरकार आले. भाजप पक्ष राजकारणात चाणक्य पक्ष म्हणून ओळखला जातो. निवडणुका जवळ येताच राजकीय उलथापालथ करणे भाजपसाठी काही नवीन नाही. एकनाथ शिंदे यांच्या मदतीने राज्यात सत्ता स्थापन करण्यात भाजपने बाजी मारलीच. राज्यात सत्ता स्थापन करताच मुंबई महापालिकेत भाजपने पुन्हा एकदा पाय रोवला आणि पालक मंत्री मंगलप्रभात लोढा यांना कार्यालय उपलब्ध झाले. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी कार्यालय असल्याचा भाजप नेत्यांचा दावा असला तरी मुंबई महापालिकेतील प्रशासकावर आपली पकड घट्ट केली. एकनाथ शिंदे राजकारणातले कच्चे खेळाडू नाहीत. त्यांनीही नव्या उमेदीने राजकारणात उडी घेतली आहे. परंतु भाजपला साथ देणारे एकनाथ शिंदे यांच्यासाठी मात्र यंदाच्या निवडणुका अस्तित्वाची लढाई असणार आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे स्वतः स्वच्छ व सुंदर मुंबई अभियानात सक्रिय झाले आहेत, तर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे मंत्री, नेते यांनीही आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वतःला झोकून दिले आहे. कोळीवाड्यांचा कायापालट, भूमिगत मार्केट, फूड कोर्ट अशा घोषणा त्यांच्या नेतृत्वाखालील मंत्र्यांनी केल्या. एका भूमिगत मार्केट बांधणीसाठी सुमारे २५० ते ३०० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. त्यात भूमिगत मार्केटमध्ये फेरीवाला, ग्राहक येणार का हा प्रश्न आहेच. त्यामुळे निवडणुका जवळ आल्याने राजकीय पक्षांकडून घोषणांचा पाऊस होणे अपेक्षित असले, तरी त्याची अंमलबजावणी मात्र कागदावरच असते, हेही तितकेच खरे.

आरोप-प्रत्यारोपांची मैफिल रंगणार!

लोकसभा, विधानसभा व मुंबई महापालिकेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून, सत्ता काबीज करण्यासाठी राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरुवात केली आहे. एकेकाळचे दोन मित्र पक्ष आज राजकीय वैरी झाले असून, एकमेकांवर विरोधात चिखलफेक सुरू केली आहे. शिवसेनेने चार दशकांत काय केले हे समोर आणण्याचा प्रयत्न भाजपकडून सुरू आहे, तर चार दशके भाजपने शिवसेनेबरोबर सत्तेचा उपभोग घेतला, त्यावेळी भाजपची सभ्यता कुठे गेली होती, असा टोला ठाकरेंच्या शिवसेना नेते लगावत आहेत. एकूणच आरोप-प्रत्यारोपांची मैफिल रंगत असली, तरी नेतेमंडळींचा उद्देश मात्र एकच ८६ हजार कोटींच्या ठेवी असलेल्या मुंबई महापालिकेची सत्ता काबीज करणे!



निवडक मुंबई

पुण्यात आयटीतील तरुणीची मित्राकडून हत्या

पुणे : पिंपरी-चिंचवडमधील हिंजवडी भागातील एका लॉजवर २६ वर्षीय तरुणीची तिच्या मित्राने गोळ्या झाडून हत्या केली. या संबंधात आरोपी ऋषभ निगम याला मुंबईतून अटक करण्यात आली आहे. रविवारी सकाळी पोलिसांना या घटनेची माहिती मिळाली. त्यानंतर चौकशी सुरू करून आरोपीला मुंबईतून अटक करण्यात आली. हत्येमागे काय हेतू आहे, ते स्पष्ट झाले नाही. प्राथमिक माहितीनुसार आरोपी व मृत तरुणी हे दोघेही उत्तर प्रदेशचे रहिवासी असून ते रिलेशनशिपमध्ये होते. मृत तरुणी हिंजवडी येथील एका आयटी फर्ममध्ये कामाला होता आणि आरोपी यूपीमध्ये राहत होता. आरोपी हा उत्तर प्रदेशातून आला होता आणि हिंजवडी येथील एका लॉजमध्ये राहत होता, तिथे त्याने या तरुणीला फोन केला. शनिवारी रात्री त्याने महिलेवर गोळी झाडली आणि तो पळून गेला. आम्हाला रविवारी सकाळी घटनेची माहिती मिळाली, असे उप. पोलीस आयुक्त बापू बांगर यांनी सांगितले. या व्यक्तीचा शोध घेऊन मुंबईत ताब्यात घेण्यात आले असून पुढील चौकशीसाठी त्याला पुण्यात आणण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. यामागील हेतू अद्याप स्पष्ट झालेला नाही. हिंजवडी पोलीस ठाण्यात आयपीसीच्या संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

कोयना धरण परिसरात भूकंपाचा सौम्य धक्का



कराड : पाटण तालुक्यातील कोयना धरण परिसरात रवि. २८ रोजी संध्याकाळी ५ वाजून ०६ मिनिटांनी ३.१ रिश्टर स्केलचा भूकंपाचा सौम्य धक्का झाला. या भूकंपाचा केंद्रबिंदू कोयना धरणापासून १६ किलोमीटर अंतरावरील कोयना खोऱ्यात हेळवाक गावचे नैऋत्येस सहा किलोमीटर अंतरावर होता. या भूकंपाची खोली नऊ किलोमीटर अंतरावर असल्याची माहिती कोयना भूकंप मापन केंद्रावरून देण्यात आली. या भूकंपाची तीव्रता अत्यंत कमी असल्याने याची कोयना धरणाला कोणत्याही प्रकारची हानी झाली नसून, धरण पूर्णपणे सुरक्षित असल्याची माहिती कोयना धरण व्यवस्थापनाकडून देण्यात आली आहे. तसेच भूकंप क्षेत्रात कोठेही जीवित वा वित्तहानी झाली नसल्याची माहितीही प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

कोस्टल रोडवर चोख सुरक्षा

प्रत्येक गाडीची व्हिडीओ शूटिंग; प्रत्येक १०० मीटरवर आपत्कालीन कॉल बॉक्स

- व्हिडीओ इन्सिडंट डिटेक्शन सिस्टम कॅमेरा - ३०
- सीसीटीव्ही कॅमेरे - इंट्री व एक्झिट व छेद बोगद्याजवळ असे एकूण २४
- पब्लिक ॲड्रेस स्पिकर - ८०



मुंबई : कोस्टल रोड अर्थात सागरी किनारा मार्गावरून दररोज हजारो गाड्यांची ये-जा होणार आहे. कोस्टल रोड प्रकल्पात सोयीसुविधा उपलब्ध करताना वाहनधारकांच्या सुरक्षेवर भर दिला आहे. कोस्टल रोड प्रकल्पात दोन महाकाय बोगदे खोदले असून, बोगद्यातून ये-जा करणाऱ्या प्रत्येक गाडीची व्हिडीओ शूटिंग होणार आहे. तसेच प्रत्येक १०० मीटर अंतरावर सीसीटीव्ही कॅमेरे ही बसवण्यात येणार आहेत. गाडी बिघडली, काही घडलं तर कंट्रोल रूममध्ये संपर्क साधण्यासाठी प्रत्येक १०० मीटर अंतरावर कॉल बॉक्स असणार आहे.

ऑक्टोबर २०१८मध्ये शुभारंभ झालेल्या कोस्टल रोड प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. कोस्टल रोड प्रकल्पात दोन महाकाय बोगदे खोदण्यात आले असून, थंडानी जंक्शन वरळी ते मरीन ड्राइव्ह दरम्यान एक मार्गिका वाहतुकीसाठी अंशतः खुली करण्याचे नियोजन पालिका प्रशासनाने केले आहे. पाच वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या कोस्टल रोडची एक मार्गिका अंशतः वाहतुकीसाठी खुली होणार असली, तरी संपूर्ण कोस्टल रोडची सफर मे २०२४ नंतरच होणार आहे. मुंबईची वाहतूककोंडी फोडण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या कोस्टल रोड प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू असून, प्रवासी सेवेत आणण्यासाठी दिवसरात्र काम सुरू आहे. चार हजार कामगार, अद्ययावत तंत्रज्ञान साहित्य सामुग्रीचा वापर करण्यात येत आहे. कोस्टल रोडच्या कामाला गती देताना प्रवाशांच्या सुरक्षेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे तर बसवणार आहेच, व्हिडीओ शूटिंग करणारे अद्ययावत शूटिंग कॅमेरा बसवण्यात येणार आहेत.

दरम्यान, आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधण्यासाठी प्रत्येक ५० मीटर अंतरावर पब्लिक ॲड्रेस स्पिकर बसवण्यात आले आहेत. बोगद्यात १०० मीटर अंतरावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येत असून, बोगद्या बाहेरील रस्त्यावर प्रत्येक ३०० मीटर अंतरावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येत आहेत.

अमली पदार्थांच्या व्यापारावर नायजेरियन्सचे वर्चस्व

मेघा कुचिक/मुंबई

गेल्या काही वर्षांत नायजेरियन नागरिकांनी मुंबईतील अमली पदार्थांच्या व्यापारावर वर्चस्व मिळवल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. नायजेरियन लोक अवैध व्यापारात गुंतले असून, त्याचा सर्वात मोठा धोका मुंबईतील तरुणांना आहे. तसेच शहरातील पोलीस यंत्रणेला त्यांचे आव्हान निर्माण झाले आहे.

दहा वर्षांपूर्वी नायजेरियन नागरिक मुंबईतील अमली पदार्थ व्यवसायात उतरल्याचे दिसून आले. आता शहरातील ८० ते ९० टक्के नायजेरियन हे गुन्हेगारी व्यवसायाशी संबंधित आहेत. गुन्हेगारीच्या दरात वाढ होत असून शहरातील तरुणांसमोर मोठा धोका निर्माण झाला आहे. पोलिसांकडून त्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे मात्र, अमली पदार्थांच्या व्यवसायात सध्या किती टोळ्या सक्रिय आहेत, याची माहिती पोलिसांना मिळालेली नाही.

मुंबईत नायजेरियन नागरिक वेगवेगळ्या व्हिसावर येतात. त्यात शिक्षण, वैद्यकीय, काम व पर्यटक व्हिसाचा समावेश असतो. शहरात आल्यानंतर गुन्हेगारी क्षेत्रातील हे नायजेरियन त्यांचे पासपोर्ट नष्ट करतात. ज्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांसाठी त्यांना हद्दपार करणे आव्हानात्मक बनते. जेव्हा गुन्हेगारी कृत्यांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींना अटक केली जाते तेव्हा त्यात कायदेशीर गुंतागुंत निर्माण होते. कायदेशीर कारवाई पूर्ण होईपर्यंत त्यांना त्यांच्या मायदेशी परत जाण्यापासून प्रतिबंधित केले जाते. विशेष म्हणजे बहुतांशी नायजेरियन लोक मुंबईच्या बाहेर म्हणजे मीरा रोड, वसई-विरार पट्ट्यात राहणे पसंत करतात. तसेच नवी मुंबईतील उलवे, वाशी व खारघर येथे त्यांनी बस्तान बसवले आहे. तेथे त्यांचा अमली पदार्थांचा व्यवसाय संपूर्ण शहरात करतात.

या व्यक्तींनी बनवलेल्या टोळ्या फसव्या आहेत. त्यामुळे त्यांना ओळखणे आणि पकडणे पोलिसांना कठीण होते. पोलिसांनी सांगितले की, या नायजेरियन नागरिकांनी आपले जाळे नियोजन पद्धतीने विणले असून ते अत्यंत गुप्तपणे कार्यरत असते. ते कोकेन, एमडी, एलएसडी व एमडीएमए हे अमली पदार्थ विकतात. त्यांचे या व्यवसायातील मास्टरमाइंड नायजेरिया किंवा आफ्रिकन देशात बसलेले आहेत. दारिद्र्य, निरक्षरता व बेरोजगारीमुळे हे लोक अमली पदार्थांच्या व्यवसायात ओढले जातात. त्यातून त्यांना सहजपणे पैसे मिळतात.



नायजेरियन महिला तस्करीत आघाडीवर

अमली पदार्थ तस्करीत नायजेरियन महिला आघाडीवर आहेत. काही नायजेरियन पुरुष स्थानिक किंवा मराठी महिलांशी लग्न करतात. त्यामुळे स्थानिक भाषेतून संवाद साधणे सोपे बनते. ऑनलाईन फ्रॉडपासून अमली पदार्थांच्या व्यापाऱ्यात नायजेरियन लोकांनी मोठा जम बसवला आहे.

मुंबईच्या तरुणांना धोका

मुंबईच्या अमली पदार्थ व्यापारात नायजेरियन टोळींचे वर्चस्व वाढू लागले आहे. त्याचा धोका मुंबईकर तरुणांना आहे. या मुद्याला तोंड देण्यासाठी स्थानिक व आंतरराष्ट्रीय पोलिसांची मदत आवश्यक आहे. नायजेरियातून येणाऱ्या नागरिकांवर कडक निर्बंध लावणे, जनजागृती करणे त्यातूनच नायजेरियन्सवर नियंत्रण मिळवता येऊ शकते. त्यातूनच मुंबईकरांचा सुरक्षितता मिळू शकते.

नायजेरियन्स टोळीत भारतीयांना प्रवेश नाही

या नायजेरियन टोळ्या मुंबईत समुद्र किंवा हवाई मार्गाने व माणसांद्वारे अमली पदार्थ पाठवतात. माणसांच्या शरीराच्या विविध भागात हे अमली पदार्थ टाकले जातात. ते शोधणे जिकीरीचे असते. विशेष म्हणजे, हे लोक त्यांच्या स्थानिक भाषेत व्हॉट्सॲप, टेलिग्राम किंवा इन्स्टाग्रामवर संवाद साधतात. त्यामुळे अधिकाऱ्यांना त्यांना शोधणे अवघड बनते. ते या व्यवसायात भारतीयांना सामील करून घेत नाही. कारण त्यांचा भारतीयांवर विश्वास नसतो. कारण भारतीय नागरिक हे पोलिसांना कळवतील, असा त्यांचा ठामे विश्वास असतो.

लालबाग ब्रिजवरील अपघातात दोघांचा मृत्यू

मुंबई : शनिवारी रात्री उशिरा लालबाग ब्रिजवर झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. ऋषिकेश रमेश सालकर आणि शैलेश दत्तात्रय सैद अशी या दोघांची नावे आहेत. या अपघाताला ऋषिकेश सालकर हाच जबाबदार असल्याने त्याच्याविरुद्ध काळाचौकी पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. हा अपघात शनिवारी रात्री उशिरा अडीच वाजता लालबाग चौकीच्या समोरील ब्रिजवर भायखळ्याकडे जाणाऱ्या वाहिनीवर झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

ऋषिकेश आणि शैलेश हे दोघेही साकीनाका येथील मोहिली गाव, डोंगरे उसमान गावचे रहिवाशी आहेत. शनिवारी रात्री ते दोघेही लालबाग येथून भायखळाच्या दिशेने जात होते. ही बाइक लालबाग ब्रिजवरून जाताना ऋषिकेशने भरवेगात बाइक चालविण्याचा प्रयत्न करताना काही वाहनांना ओव्हरटेक केले होते. त्यात त्याचा बाइकवरील नियंत्रण सुटले आणि त्याच्या बाइकने संरक्षक भिंतीला जोरात धडक दिली. या अपघातात ते दोघेही जखमी झाले होते. अपघाताची माहिती कंट्रोल रूममधून मिळताच काळाचौकी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. जखमी दोघांनाही पोलिसांनी जे. जे. रुग्णालयात दाखल केले. तिथे या दोघांनाही डॉक्टरांनी मृत घोषित केले होते.

त्यांच्याकडील कागदपत्रांसह मोबाईलवरून त्यांची नावे ऋषिकेश सालकर आणि शैलेश सैद असल्याचे उघडकीस आले. प्राथमिक तपासात भरवेगात बाइक चालविताना ओव्हरटेक करणे त्यांच्या जीवावर बेतले होते. त्यामुळे सहाय्यक फौजदार सुधाकर रामचंद्र माने यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी ऋषिकेशवर हलगजीपणाने बाइक चालवून स्वतःसह शैलेश सैद यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा नोंदविला होता. शवविच्छेदन केल्यानंतर दोघांचे मृतदेह त्यांच्या नातेवाईकांना सोपविण्यात आले होते.

विरोधी पक्ष आणि सत्ताधाऱ्यांनी सामंजस्याची भूमिका घ्यावी

मुंबई : आपण जे संविधान तयार केले आहे, त्याचा सर्वांनी आदर केला पाहिजे. एखाद्या विषयाचा निषेध नोंदविण्यासाठी बऱ्याच वेळेला सभागृहात सदस्यांकडून कागद फेकण्यात येतात, बाक वाजविले जातात, अगदी आक्रमकपणे पीठासीन अधिकाऱ्याकडे येण्याचा प्रयत्न केला जातो, अशावेळी पीठासीन अधिकाऱ्यांनी घाबरून न जाता, दबावाला बळी न पडता योग्य निर्णय घेतला पाहिजे. पीठासीन अधिकाऱ्याला बऱ्याचदा कामकाज चालवणे अशक्य असते. त्यामुळे विरोधी पक्ष आणि सत्ताधारी यांनी सामंजस्याची भूमिका घेऊन सभागृहात कामकाज सुरळीतपणे चालेल याकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे मत विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.



विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे मत

रविवार, २८ जानेवारी रोजी, विधानभवनात अखिल भारतीय पीठासीन अधिकारी यांच्या ८४ व्या परिषदेच्या कार्यक्रमात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित मान्यवरांना संबोधित केले.

यावेळी उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, बऱ्याचदा सभागृहात दोन सदस्यांमध्ये असभ्य भाषेत, एकेरीमध्ये मोठ्या आवाजात बोलले जाते हे कुठेतरी थांबले पाहिजे. सभागृहाची शिस्त सर्वांनी पाळली पाहिजे. जेणेकरून सभागृहात शांततेच्या मार्गाने चर्चा व एकमेकांचा आदर केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

सर्वांनी एकत्रित येऊन विधिमंडळ कामकाजाच्या नियमांमध्ये असणाऱ्या असांसदीय शब्दांची फेररचना करून नवीन असांसदीय शब्दांचा त्यामध्ये समावेश करणे आवश्यक असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.

पिठासीन अधिकाऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता सभागृहाचे कामकाज चालवावे

बऱ्याचदा विरोधी पक्षाकडून कामकाज बंद पडण्याचा निर्णय आधीच होताना दिसतो. तसे न होता पीठासीन अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी संवाद करून पुढील विषयावर सभागृहाचे कामकाज सुरू केले पाहिजे. महिला सदस्यांनी न घाबरता, न डगमगता ठामपणे बोलले पाहिजे. सभागृहात त्यांचे प्रश्न मांडले पाहिजेत कोणी टीका केली, तर त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. आपले मनोबल खचू न देता व डोळ्यात अश्रू न येऊ देता सभागृहात हिरिरीने सहभागी झाले पाहिजे. पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहातील कामकाजाच्या वेळेचे नियोजन काटेकोरपणे केले पाहिजे. सदस्यांनी देखील मोजक्या वेळेतच आपले म्हणणे मांडले पाहिजे. जेणेकरून सभागृहात जास्तीत जास्त काम करणे शक्य होईल आणि नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी मदत होईल, असे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

सहा दिवसांत १९ लाख ६६ हजार घरांचे सर्वेक्षण

दोन लाखांहून अधिक घरांचा सर्वेक्षणाला नकार

साडेपाच लाखांहून अधिक घरांना टाळे

असे होतेय घरांचे सर्वेक्षण

२३ ते २८ जानेवारी दरम्यान सर्वेक्षण
२३ जानेवारी- २,६५,१२०
२४ जानेवारी - ५,३९,४८८
२५ जानेवारी - ६,७३,८८३
२६ जानेवारी - ४,५४,९२३
२७ जानेवारी - ४,८५,४०२
२८ जानेवारी - ३,८८,७०२

सर्वेक्षणाला नकार

२३ जानेवारी - ३१,०६९
२४ जानेवारी - ४६,४२७
२५ जानेवारी - ५९,२६७
२६ जानेवारी - ४७,१७४
२७ जानेवारी - ४९,५९४
२८ जानेवारी - ३६,०५४

मुंबई : मराठा समाज व खुल्या प्रवर्गाच्या सहा दिवसांच्या सर्वेक्षणात १९ लाख ६६ हजार ९२६ घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. २३ ते २८ जानेवारी या सहा दिवसांत २ लाख ६९ हजार ४९५ घरांनी सर्वेक्षणाला नकार दिला असून ५ लाख ७० हजार ९८४ घरांना टाळे होते, अशी पालिकेच्या सर्वेक्षणातून समोर आली आहे.

मराठा समाज व खुल्या प्रवर्गाच्या सर्वेक्षणाला २३ जानेवारीपासून मुंबईत सुरुवात झाली आहे. ३१ जानेवारीपर्यंत ३९ लाख घरांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी पालिकेच्या विविध विभागांतील ३० हजार कर्मचाऱ्यांवर सर्वेक्षणाचे काम सोपवण्यात आले आहे. २३ जानेवारी पहिल्या दिवशी २ लाख ६५ हजार १२० घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाले, तर २८ जानेवारीला सहाव्या दिवशी ३ लाख ८८ हजार ७०२ घरांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आल्याचे पालिकेच्या आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.



भुजबळांचे गैरसमज दूर होतील

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्पष्टीकरण

प्रतिनिधी/मुंबई : राज्य सरकारने जी अधिसूचना काढली आहे ती कुणबी नोंदी जुन्या आहेत त्यांच्यासाठीचा हा निर्णय आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा जो निर्णय आहे त्याबाबत मागासवर्ग आयोग इंपेरिकल डेटा गोळा करत आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर विधिमंडळाचे विशेष अधिवेशन घेऊन ओबीसी किंवा इतर कोणत्याही समाजावर अन्याय न करता राज्य सरकार आरक्षण देणार आहे. छगन भुजबळ हे आमचे सहकारी मंत्री आहेत. त्यांनी व्यवस्थित माहिती घेतल्यानंतर त्यांचा गैरसमज दूर करण्यात यश येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. ओबीसी किंवा इतर समाजाचे आरक्षण कमी न करता किंवा त्यांच्यावर कोणताही अन्याय न करता मराठा समाजाला आरक्षण देण्याची आमची भूमिका पहिल्या दिवसापासूनच असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



जुन्या कुणबी नोंदी असणाऱ्यांसाठी अधिसूचनेचा निर्णय घेतला आहे. मराठा समाजातील रक्ताचे नातेवाईक, सगेसोयरे यांनाही आरक्षणाचा लाभ मिळावा म्हणून हा निर्णय घेतला आहे. इतरांच्या हक्काला बाधा न पोहोचविता आम्हाला आरक्षण दु,या अशीच मागणी जरांगे-पाटील यांची होती. अधिसूचनेतही सर्व बाबी स्पष्ट केल्या आहेत. उलट ही अधिसूचना इतर समाजांसाठीही मार्गदर्शकच ठरणार आहे, तर मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या निर्णयावर मागासवर्ग आयोग काम करत आहे. चार लाख लोक तीन पाळ्यांमध्ये काम करत आहेत. इंपेरिकल डेटा गोळा करण्याचे हे काम ३६ जिल्ह्यांमध्ये सुरू आहे. मराठा समाज शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मागास कसा, हे या अहवालातून स्पष्ट होईल.

मागासवर्ग आयोग हा अहवाल सरकारला सादर करेल. त्यानंतर राज्य सरकार विशेष अधिवेशन घेऊन मराठा समाजाला आरक्षण देईल. ओबीसी किंवा इतर कोणत्याही समाजावर अन्याय न करता राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देईल, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

प्रत्येक समाजाला न्याय देणारा सुवर्णमध्य

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी/मुंबई : राज्य सरकारच्या अध्यादेशमुळे मराठा समाजाला असलेला अधिकार सोप्या पद्धतीने त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचे काम झाले आहे. नोंदी असणाऱ्या मराठा समाजाला प्रमाणपत्र मिळणे कायदेशीरच होते. हे करत असताना ओबीसी समाजाला देखील शंभर टक्के सुरक्षा दिली असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.



मंत्री छगन भुजबळ यांच्या भूमिकेबाबत विचारले असता, यावर काही नेत्यांची व्यक्तिगत भूमिका वेगळी असू शकते. नेमके काय केले आहे हे त्यांच्या लक्षात आणून देण्यात येईल. मराठा समाजाला फायदा होत असताना कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, असा सुवर्णमध्य शासनाने काढला आहे. यामुळे कोणालाही चिंता करण्याचे कारण नाही. आमचे सरकार ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही. मागच्या काळात मराठा समाजाला दिलेले आरक्षण उच्च न्यायालयात टिकले होते. परंतु काही कारणांमुळे सर्वोच्च न्यायालयाने ते आरक्षण फेटाळले. याच कारणांची मीमांसा करणारे सर्वेक्षण देखील आपण सुरू केले असल्याचेही ते म्हणाले.

आंगणेवाडी येथे सुसज्ज स्वच्छतागृहाचे दिमाखात लोकार्पण

महाविजयासाठी रवींद्र चव्हाणांचे आई भराडीला साकडे !

मालवण : "केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केल्यानंतर जिल्ह्यात आमूलाग्र बदल झाला आहे. आमचा जिल्हा सर्वच बाबतीत बेस्ट आहे. जिल्ह्यातील प्रत्येक व्यवस्थे बद्दल सकारात्मक विचार ठेवा. व्होकल फॉर लोकलचा प्रचार आपणच करायचा आहे. जिल्ह्यात पर्यटनाच्या माध्यमातून मोठा बदल शक्य आहे. आगामी काळात लोकसभेच्या महाविजयासाठी आपण आज आई भराडीदेवीच्या चरणी साकडे घालत पंतप्रधान पुन्हा नरेंद्र मोदीच व्हावेत", असे साकडे घातल्याचे प्रतिपादन जिल्ह्याचे पालक मंत्री रवींद्र चव्हाण यांनी आंगणेवाडी येथे केले.

आंगणेवाडी येथील श्री भराडीदेवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची स्वच्छतागृह अभावी गैरसोय होत असल्याने सुमारे २ कोटी निधी खर्च करून उभारण्यात आलेल्या सुसज्ज स्वच्छतागृहाचा लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.



यावेळी भाजप नेते कुडाळ मालवण विधानसभा प्रमुख निलेश राणे, जिल्हाधिकारी किशोर तावडे, भाजप जिल्हा अध्यक्ष प्रभाकर सावंत, आंगणे कुटुंबीय अध्यक्ष भास्कर आंगणे, सीईओ प्रजित नायर, जिल्हा पोलीस प्रमुख सौरभ कुमार अग्रवाल, सेवानिवृत्त उप मुख्य कार्य अधिकारी राजेंद्र पराडकर, सरपंच मानसी पालव, उपरपंच समीक्षा आंगणे, भाजप नेते राजन तेली, तहसीलदार वर्षा झालटे, नायब तहसीलदार श्रद्धा चौगले, बीडीओ आत्मज मोरे, पोनि प्रवीण कोल्हे, तालुका अध्यक्ष धोंडी चिंदरकर, अशोक सावंत, बाबा परब, ठेकेदार संतोष कदम आदी उपस्थित होते.

पालक मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले, "देशात आणि राज्यात हिंदुमय वातावरण निर्माण झाले आहे. संस्कृती जपण्यासाठी सरकारचे पाठबळ मिळत आहे. वेगवेगळे विकास प्रकल्प जिल्ह्यात येत आहेत. नेव्ही डे नंतर राजकोट किल्ला पाहण्यासाठी लाखो पर्यटक येत आहेत. यातून व्यापार सुद्धा वाढत आहे. सिंधुदुर्गमधील सर्व किल्ल्यांचे संवर्धन होण्यासाठी भाजपची टीम काम करत आहे. भगवंतगड, रामगड, नांदोस या किल्ल्यावर जमीनमालकांनी जागा देण्याची संमती दिली आहे. बजेटमध्ये या किल्ल्यांना आदर्श पद्धतीने संवर्धन करण्यासाठी निधी देण्यात येणार आहे. मोरयाचा धोंडा हे देवस्थान सुद्धा विकसित होत आहे."

मंडळाचे अध्यक्ष भास्कर आंगणे यांनी पालक मंत्री यांचे आभार मानताना मागील सात वर्षे केवळ आश्वासन मिळालेली कामे पालक मंत्री यांनी पूर्ण केल्याचे सांगितले. पालक मंत्री यांची भराडीदेवीवर असलेली श्रद्धा त्यांना येथील विकासकामांसाठी प्रेरणा देत आहे. यावेळी आंगणे कुटुंबीयांच्या वतीने पालक मंत्री रवींद्र चव्हाण व भाजप नेते निलेश राणे यांच्या विशेष सत्कार करण्यात आला.

सूर्य देव आहे की ग्रह? त्यांची इतर नावे काय आहेत ते जाणून घ्या

रविवार हा सूर्य देवाला समर्पित आहे ज्यांच्या प्रकाशाद्वारे विश्वाचा संवाद साधला जात आहे. सूर्यदेवाची उपासना केल्याने तुमचे भाग्य तर उजळतेच, पण तुम्हाला प्रत्येक क्षेत्रात मान-सन्मान मिळतो. धार्मिक मान्यतांनुसार सूर्यदेवाला नियमित अर्घ्य दिल्याने व्यक्ती रोगमुक्त राहते आणि इच्छित परिणाम प्राप्त होतात. सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण करण्यासाठी तांब्याच्या कलशात पाणी, अखंड, लाल सिंदूर, लाल फुले आणि साखरेची मिठाई मिसळावी. अनेकदा आपल्या मनात प्रश्न येतो की सूर्य हा देव आहे की ग्रह?



सूर्यदेव आहे

पौराणिक कथेनुसार, सूर्यदेवाच्या उत्पत्तीचे अनेक संदर्भ आहेत. पौराणिक मान्यता अशी आहे की सूर्यदेवाचे वडील महर्षी कश्यप आणि आई अदिती होती. आदितीच्या मुलाचे नाव आदित्य होते. 33 कोटी देवतांमध्ये आदितीच्या 12 पुत्रांचा समावेश आहे, त्यापैकी एक सूर्यदेव देखील आहे.

सूर्यदेवाचे कुटुंब

सूर्यदेव यांचा विवाह भगवान विश्वकर्मा यांची कन्या संग्या हिच्याशी झाला होता, ज्यांच्यापासून तीन मुले झाली. त्यातून मनु, यम आणि एक मुलगी यमुना हे दोन पुत्र झाले. यमुनेलाच कालिंदी म्हणतात.

सूर्यालाा इतर कोणत्या नावांनी ओळखले जाते?

रवी, दिनकर, दिवाकर, दिनमणी, आदित्य, अनंत, सविता, प्रभाकर, मार्तंड, अर्क, भानू, भास्कर, पतंग आणि विवासवान.

सूर्य देव किंवा ग्रह

पौराणिक ग्रंथानुसार सूर्य हा ग्रह नसून देवता आहे. वेदांमध्ये सूर्यदेवाला जगाचा आत्मा म्हणून वर्णन केले आहे. ज्योतिषशास्त्र आणि पुराणांमध्ये सूयार्चा संबंध सूर्य देवाशी आहे. त्याचा जन्म पृथ्वीवर झाला असे म्हणतात. दुर्सया मान्यतेनुसार, महर्षी कश्यप यांच्या पत्नी अदितीने कठोर तपश्चर्या केल्यावर एका आश्चर्यकारक मुलाला जन्म दिला. पुराणानुसार, सूर्यदेवानेच माता अदितीला तिच्या गभार्तून जन्म घेण्याचे वरदान दिले होते. विश्वासांनुसार, नाम सूयार्चे तेजस्वी रूप सहन करू शकत नाही आणि तिने स्वतःची सावली तयार केली, ज्याला स्वर्ण म्हणतात. स्वर्णाच्या पोटातून सवर्ण मनु, शनि आणि ताप्ती ही मुले झाली.

स्मार्टफोन चार्ज करतांना तुम्हीही या चुका करत असाल तर वेळीच सावध व्हा अशाने तुमचा स्मार्टफोन लवकर खराब होऊ शकतो. जाणून घेऊया याबद्दल सविस्तर. पाहा स्मार्टफोन चार्ज करण्याची योग्य पद्धत.

स्मार्टफोन चार्ज करतांना 'या' चुका करत असाल तर, फोन होणार लवकर खराब, घ्या काळजी

गेल्या काही काळात स्मार्टफोनचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. आता प्रत्येकाच्या हाती स्मार्टफोन दिसतो. फोनच्या इतर फीचर्स प्रमाणे बॅटरी आणि चार्जिंगपद्धत देखील तितकीच महत्वाची असते तुमचा फोन ५० टक्क्यांहून अधिक चार्ज झाला असला तरीही, चार्जर दिसताच लगेच फोन चार्जिंगला ठेवावा असे तुम्हालाही वाटत असेल. यामागील कारण देखील तसेच आहे. आजकाल स्मार्टफोनमध्ये बॅटरीचा वापर जास्त आहे आणि फोन कधीही डिस्चार्ज होतो. पण, तुम्हाला माहितेय का? असे करून तुम्ही तुमच्या फोनमध्ये गोंधळ घालत आहात. तुमचा फोन कुठेही चार्जवर ठेवू नका. यामुळे फोनचे बरेच नुकसान होते. अनेक स्मार्टफोन युजर्स त्यांच्या फोन चार्जिंगबाबत इतरही अनेक चुका करतात, ज्यामुळे फोन लवकर खराब होण्याची शक्यता असते. आज आम्ही अशाच काही चुकांबद्दल माहिती देणार आहो. जे स्मार्टफोन युजर्स फोन चार्ज करतांना हमखास करतात.



बनावट चार्जर वापरणे:

अनेक युजर्स खर्च टाळण्याच्या नादात स्वस्त प्रोडक्टस वापरतात. ब्रँडेड चार्जर महाग आहेत, त्यामुळे लोक स्वस्त अनब्रँडेड चार्जर वापरतात. पण याचा बॅटरीच्या परफॉर्मन्सवर परिणाम होतो हे अनेकांना माहीत नाही. या fake/Local चार्जर्सना वीज पुरवठ्याचे कोणतेही मानक नसल्यामुळे फोनला योग्य प्रमाणात वीज मिळत नाही. यामुळे फोनची Battery Power खराब होते आणि खराब दजार्चा चार्जर फोन खराब होऊ शकतो. नुकत्याच झालेल्या Xiaomi फोन स्फोटातही हेच प्रकरण पाहायला मिळाले.

बॅटरी 0 टक्के :

आजकाल स्मार्टफोन प्रत्येकाच्या आयुष्याचा महत्वाचा भाग झाले आहेत. किती तरी रोजची महत्वाची कामं स्मार्टफोनच्या मदतीनेच केली जातात. अशात स्मार्टफोन पूर्ण चार्ज व्हावा आणि त्याचे बॅटरी लेव्हल ० पर्यंत जाऊ नये म्हणून लोक सतत फोन चार्ज करत असतात. पण, अनेकदा युजर्स Battery level 0 % पर्यंत जाऊ देतात. तुम्ही अनेकदा तुमच्या फोनची बॅटरी पूर्णपणे डिस्चार्ज करत असाल तर तेही चुकीचे आहे. यामुळे बॅटरी खराब होण्याचा धोकाही वाढतो. लिथियम-आयन बॅटरीचे वारंवार डिस्चार्ज कामगिरीवर परिणाम करते.

अधिक वायरलेस चार्जिंग वापरणे :

सध्या अनेक लेटेस्ट फीचर्स असलेले फोन मार्केटमध्ये उपलब्ध आहेत. तसेच, आजकाल अनेक फोनमध्ये वायरलेस चार्जिंग सपोर्ट देण्यात येतो. पण, कदाचित तुम्हाला माहित नसेल की, फोन चार्ज करण्यासाठी तुम्ही जास्त वायरलेस चार्जिंग न वापरण्याचाच कायम सल्ला दिला जातो. वायरलेस चार्जिंग दरम्यान, बॅटरी आणि केस दोन्ही खूप Heat Emit करतात. यामुळेच जास्त वायरलेस चार्जिंग वापरल्याने फोन खराब होऊ शकतो. ओव्हरहाटिंग टाळण्यासाठी, फोनमध्ये पोर्टेबल चार्जिंग वापरल्यास ते चांगले होईल.

बॅटरी 100% चार्ज करणे:

अनेक जण स्मार्टफोन चुकीच्या पद्धतीने चार्ज करतात. ज्यामुळे फोनचे अधिक नुकसान होण्याची शक्यता असते. जेव्हा तुम्ही तुमचा फोन चार्जिंगवर ठेवता. तेव्हा तो १०० % पर्यंत चार्ज करण्याचा प्रयत्न असतो. पण यामुळे बॅटरीची क्षमता कमी होते याबद्दल अनेकांना माहीत नसते. बॅटरी तज्ञांचे म्हणणे आहे की, लिथियम-आयन बॅटरी ८०-३० टक्के चार्ज ठेवली पाहिजे. यामुळे फोनची पॉवर क्षमता सुधारते. म्हणून यापुढे स्मार्टफोन चार्ज करतांना या महत्वाच्या गोष्टींकडे लक्ष दिल्यास नुकसान होणार नाही.

मोबाईल केससह फोन चार्ज करणे:

आजकालचे बहुतेक फोन मेटल बॉडीचे बनलेले असतात. युजर्स सुद्धा स्मार्टफोनला चांगला लूक मिळावा याकरिता त्यावर फॅन्सी कव्हर्स वर ठेवतात. अशा परिस्थितीत, चार्जिंग दरम्यान तुमचा फोन जास्त गरम होण्याची तक्रार निर्माण होऊ शकते. त्यामुळे जर तुमच्याकडे फॅन्सी कव्हर असेल, ज्यामध्ये मेटल वर्क असेल तर चार्जिंग करताना ते काढून टाका. इतकेच नाही तर असे अनेक कव्हर्स आहेत ज्यांमुळे चार्जर नीट कनेक्ट होत नाही. जर तुमच्या फोनच्या बाबतीत असे असेल तर फक्त कव्हर काढून टाका.

वास्तुशास्त्रात निदेर्शानुसार क्रिया केल्याने नेहमी इच्छित परिणाम मिळतात. आज उत्तर-पूर्व दिशेबद्दल बोलूया. उत्तर आणि पूर्व यांमधील दिशेला वास्तूमध्ये ईशान्य कोन म्हणतात. हे दिशा-क्षेत्र कोणत्याही वास्तूचे सर्वात पवित्र स्थान आहे ज्यामध्ये देवाचा निवास आहे. असे मानले जाते की घराचा ईशान्य कोपरा नेहमी स्वच्छ ठेवला पाहिजे जेणेकरून घरात सुख, शांती, आरोग्य आणि लक्ष्मी वास करते. ईशान हे भगवान शिवाचे नाव देखील आहे आणि त्याचे स्थान उत्तर-पूर्व दिशेला आहे. त्यामुळे घरातही ही दिशा केवळ मंदिर किंवा पूजेसाठी वापरली जाते. वास्तूनुसार या स्थानासाठी काही खास गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे.

ईशान्य कोपरा महत्त्वाचा का? जाणून घ्या या दिशेबद्दल महत्त्वाची माहिती

ईशान मध्ये काय करू नये

- वास्तूनुसार घराच्या ईशान्य कोपर्यात कोणतीही जड वस्तू ठेवू नये. असे मानले जाते की जर तुम्ही या ठिकाणी एखादी जड वस्तू ठेवली तर सकारात्मक ऊजेर्चा संचार थांबतो, ज्यामुळे तुमचे पैसे कमी होऊ शकतात. त्यामुळे या ठिकाणी जड कपाटे, स्टोअर रूम इत्यादी करणे टाळा.
- घराची ही दिशा सर्वांत पवित्र मानली जाते आणि येथे देवाचा वास असल्याचे मानले जाते. त्यामुळे या ठिकाणी कधीही शूज, चप्पल किंवा कचरा गोळा करू नका. असे केल्याने घरात नकारात्मक ऊर्जा संचारते आणि घरात समस्या येऊ लागतात.
- घराच्या ईशान्य कोपऱ्यात चुकुनही शौचालय बनवू नये. असे केल्याने शारीरिक आणि मानसिक समस्या उद्भवू शकतात आणि तुमच्या ठेवी उपचारावर खर्च होऊ लागतात.
- नवविवाहित जोडप्याची बेडरूम मुख्यतः घराच्या ईशान्य कोपऱ्यात बनवू नये. असे केल्याने परस्पर संबंधांमध्ये संघर्ष निर्माण होतो आणि अनावश्यक समस्या वाढू लागतात.

ईशान्येत काय करावे

- घरात समृद्धी हवी असेल तर घराच्या ईशान्य कोर्पयात पूजास्थान बनवावे. या ठिकाणी केलेली पूजा नेहमी देवाला मान्य असते आणि यामुळे घरातील सुख-समृद्धीही कायम राहते .घरामध्ये सकारात्मक ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी या दिशेचा भाग स्वच्छ ठेवावा जेणेकरून घरात नकारात्मक ऊर्जा राहणार नाही.
- विहीर, बोअरिंग, मटका किंवा पिण्याचे पाणी यासारख्या कोणत्याही जलस्रोतासाठी हे ठिकाण नेहमीच उत्तम असते. जर तुम्ही नवीन घर बांधत असाल तर घराच्या या कोपऱ्यात बोरिंग लावा किंवा जमिनीखाली पाण्याची टाकी बनवा.
- ही दिशा ध्यानाची दिशा मानली जाते त्यामुळे मुलांची वाचन खोली नेहमी ईशान्य दिशेला असावी.
- या दिशेने अभ्यास केल्याने लक्ष केंद्रित होण्यास मदत होते.
- या दिशेला तुळस आणि केळीचे रोप लावून त्यांची नियमित पूजा केल्याने तुम्हाला आर्थिक लाभही होतो.





ज्या प्रकारे आपण आपले मळलेले कपडे धुवून टाकतो, आणि त्यानंतर एक उत्साहपूर्ण वातावरण तयार होते, त्याप्रमाणे, आपल्या मनातील वाईट म्हणजेच नकारात्मक गोष्टी साफ कराव्या लागतात. यामुळे आपल्या रोजच्या जगण्याचा एक नवा उत्साह आणि अर्थ प्राप्त होतो.

घरातील नकारात्मक वातावरण घालवा

आपल्या आजूबाजूला नकारात्मक वातावरण असते, त्याचा अधिक प्रभाव दिसत असला, तर त्यावेळी स्वच्छता करण्याची गरज आहे. ज्या प्रकारे आपण आपले मळलेले कपडे धुवून टाकतो, आणि त्यानंतर एक उत्साहपूर्ण वातावरण तयार होते, त्याप्रमाणे, आपल्या मनातील वाईट म्हणजेच नकारात्मक गोष्टी साफ कराव्या लागतात. यामुळे आपल्या रोजच्या जगण्याचा एक नवा उत्साह आणि अर्थ प्राप्त होतो.

तेव्हा तुमच्या घरातील आजूबाजूचं वातावरण स्वच्छ करण्याचीही गरज असते. जेव्हा तुम्ही दुखद क्षणातून जात असाल तेव्हा अशा गोष्टी करणे अत्यंत महत्वाचं मानलं जातं. घर एक अशी वस्तू आहे, ज्यात अनेक वेळा नकारात्मक उर्जा भरलेली असतात, यावर तुमचा विश्वास आहे का?

अशा नकारात्मक गोष्टी हटवण्यासाठी काही गोष्टी करणे आवश्यक असते

- काही जुनाट वस्तू ज्या कधीपासून तुमच्या कामात नाहीत त्या काढून टाका,
- थोडक्यात घराची नीट स्वच्छता करा, कोपरा न कोपरा झाडून पुसून काढा.
- तुमच्या मनाशी बोला की हे जे काही करतोय. ते नकारात्मक गोष्टी घालवण्यासाठी.
- घराची स्वच्छता केल्यानंतर अगरबत्ती अथवा धूप, चंदन जाळून घरातील वातावरण उत्साही करा.
- अगरबत्ती घरातील कानाकोपऱ्यातून फिरवा, वॉर्डरोब्स उघडून येणारा गंध घालवण्यासाठी सुगंधीत वस्तूंचा धूर पसरवा.
- पवित्र मानलं जाणारं जल घरात शिंपडा, पूर्वकडील खिडकी उघडून घरात फ्रेश वारा येऊ द्या.



नुसतं दूध नको दालचिनी घातलेल दूध प्या

जर तुम्हाला थकवा जाणवत असेल आणि आरामाची गरज असेल तर झोपण्याआधी जरुर दालचिनी पूड घातलेले दूध घ्या. रात्री गरम दूध पिण्याने झोप चांगली लागते. मात्र त्यात दालचिनी पूड घातल्यास या दुधाचे फायदे अधिक वाढतात.



चांगल्या झोपेसाठी -

तुम्हाला चांगली झोप हवी असल्यास रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास दालचिनी पूड घातलेले दूध नक्की प्या. यामुळे तुम्हाला चांगली झोप येईल.

मजबूत हाडांसाठी-

दालचिनीची पूड टाकलेल्या दुधात मध टाकून प्यायल्यास हाडे मजबूत होण्यास मदत होते. याच्या नियमित सेवनाने हाडे ठिसूळ होत नाहीत.

प्रतिकारक्षमता वाढते-

दालचिनीच्या दुधाने शरीरातील प्रतिकारकक्षमता वाढते. आधीच्या काळात लहान मुलांना असे दूध दिले जात असे यामुळे लहान मुलांची रोगप्रतिकारक्षमता वाढते.

योग्य पचनासाठी-

पचनाचा त्रास असल्यास दालचिनीची पूड टाकलेले दूध प्यायल्याने फायदा होतो. तसेच गॅसचा त्रासही जाणवत असल्यास तो दूर होतो.

चांगल्या त्वचेसाठी तसेच केसांसाठी -

दालचिनीची पूड घातलेले दूध प्यायल्याने केस आणि त्वचेसंबंधित सर्व समस्या दूर होतात.

गर्भवती महिलेकरिता जीऱ्याचे पाणी लाभदायक

फोडणीकरिता किंवा गरम मसालाकरिता प्रत्येकाच्या घरी जीर हे वापरले जाते. पण या जीऱ्याचा फक्त फोडणीपुरताच वापर नसून गर्भवती महिलांनाही होतो. गर्भवती महिलांनी जीऱ्याचे पाणी पिणे हे त्यांच्या आरोग्याकरिता लाभदायक असते.



कसे प्यावे गर्भवती महिलेने जीऱ्याचे पाणी

जीऱ्याचे पाणी पिण्यासाठी आधी एक लिटर गरम पाण्यात एक चमचा जीरे टाकून ते उकळून घ्यावे. जेव्हा पाणी थंड होईल तेव्हा गाळून पिणे. जीऱ्यासकट पाणी पिऊ नये.

- **शरीरातील रक्ताचे प्रमाण कमी होऊ नाही देत.** गर्भवती महिला दोन जीवांची असते. तिच्या शरीरात रक्ताचे प्रमाण कमी होण्याचा संभव असतो. जीऱ्याच्या पाण्याने हिमोग्लोबीन वाढते आणि शरीरातील लोहाचे प्रमाणही वाढते.
- **ब्लड प्रेशरचे नियंत्रण ठेवते.** जीऱ्यात पोटॅशिअम मोठ्या प्रमाणात असते. पोटॅशिअम ब्लड प्रेशरचे नियंत्रण ठेवण्यास मदत करते.
- **रोगप्रतिकार शक्ती वाढवते.** जीऱ्यामध्ये लोहाचे प्रमाण जास्त असते जे रोगप्रतिकार शक्ती वाढवते.



कडुनिंबाचे तेल आणि पानांचा रस

- डोळ्यांची जळजळ होत असेल किंवा मोती बिंदूचा त्रास होत असेल तर कडूलिंबाचं तेल डोळ्यात अंजनासारखं घालावं.
- डोळे सूजले असतील तर कडूलिंबाची पानं बारीक करून डावा डोळा सूजला असेल तर उजव्या पायाच्या अंगठ्याला लेप लावावा. डोळ्यांची सूज उतरेल आणि लाल झालेले डोळेही बरे होतील.
- कानात किडा गेला असेल तर कडूलिंबाच्या पानांचा रस कोमट करून चिमुटभर मीठ टाकून कानात थेंब टाका... एकाच प्रयत्नात किडा मरेल.
- जर पोटात किरम (किडे) झाले असतील तर पानांच्या रसात मध मिसळून चाटण घ्यावं कीडे मरतील.
- पाण्यात कडूलिंबाच्या तेलाची काही थेंब टाकून चहा सारखं प्यावं. लहान मुलाला ५ थेंब आणि मोठ्यांना ८ थेंबाहून अधिक घ्यावेत.
- कडूलिंबाच्या पानात थोडं हिंग मिसळून चाटण घ्यावं, पोटातील किडे नष्ट होतात.
- कडूलिंबाचं तेल फॅटी ॲसिड आणि त्वचेत सहजपणे शोषून घेतलं जातं. त्यात व्हिटॅमिन ई असतं, ते त्वचेच्या पेशींमधील लवचिकता कायम ठेवतात.

तसे तर शारीरिक वेदना सामान्य समस्या आहे, लहान-सहान वेदनांसाठी अनेक लोकं डॉक्टरकडे जायला टाळतात. पण वेदनांमुळे परेशानही असतात. अश्याच काही वेदनांसाठी किचनमध्ये आपल्या वैद्य सापडू शकतो. वाचा किचनमध्ये आढळणारे 5 औषध...

घरचा वैद्य, जाणून घ्या 5 उपाय



कांदा-

कानाच्या वेदनेमुळे त्रस्त आहात, तर घाबरण्यासारखे काही नाही. कांद्याच्या रस काढून कापसाच्या मदतीने कानात दोन ते तीन थेंब टाका. काही वेळेतच आराम मिळेल.

हळद-

शारीरिक वेदनांपासून मुक्ती मिळवण्यासाठी गरमागरम दुधात हळद मिसळून सेवन करा. याव्यतिरिक्त तेल आणि हळद गरम करून शरीरावर लावल्यानेही लाभ मिळेल.

लसूण-

हे ॲंटी बॅक्टीरिअल आणि ॲंटी इंफ्लेमेटरी तत्त्वाने भरपूर औषध आहे, ज्याने उष्णताही प्राप्त होते. शारीरिक वेदनेत लसूण सर्वोत्तम विकल्प आहे. याव्यतिरिक्त कानात वेदना होत असल्यास लसणाच्या तेलाचे काही थेंब टाकल्याने आराम मिळतो.

लवंग-

दात दुखीवर लवंग सर्वोत्तम उपाय आहे. भाजलेल्या लवंगीची पेस्ट किंवा लवंगीचे तेल कापसाने दाताला लावल्याने वेदनांपासून मुक्ती मिळेल.

दालचिनी-

याने विशेषतः महिलांना मासिक पाळीदरम्यान होर्णाया त्रासापासून मुक्ती मिळते. अधिक रक्तस्त्राव होत असल्यास दालचिनी लाभकारी ठरेल. केवळ दालचिनी टाकून चहा बनवा किंवा तयार चहामध्ये दालचिनी पावडर टाकून सेवन करा.

जिममुळे होणारी गुडघेदुखी कशी रोखाल?



आजकालच्या धावपळीच्या आयुष्यात आपल्याला स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ मिळणं तसं कठीणच. म्हणून मग पैसे भरून जिम जॉईन केली जाते. पण चुकीचा व्यायाम केल्याने गुडघ्यांवर भार येतो. मग आठ-दहा दिवसांतच जिमला जाणं तुम्ही सोडून देता. यामुळे जिमसाठी भरलेले पैसे वाया जातात आणि आरोग्याचीही हेळसांड होते.

हे होऊ नये यासाठी जिम जॉईन करण्यापूर्वी पूर्ण विचार करा. तुम्हाला कोणत्या प्रकारच्या व्यायामाची जास्त गरज आहे याचा विचार करून मगच व्यायाम निवडा. फिटनेस ट्रेनरकडून व्यवस्थित प्रशिक्षण घेतल्याशिवाय व्यायामाला सुरूवात करू नका. पहिल्या दिवसापासून संपूर्ण ताकद लावू नका. यामुळे गुडघेदुखीचा आजार होण्याची शक्यता आहे.

सुरूवातीला ट्रेडमिलचा वेगही कमी ठेवा आणि हळूहळू सोयीनुसार वाढवत न्या. यामुळे गुडघ्यांवर भार येणार नाही. शिवाय एक्सरसाइज करण्यापूर्वी वॉर्मअप नक्की करा.

शेडगाव ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित करण्यात आला महिला मेळावा व हळदकुंकू कार्यक्रम विविध स्पर्धा व कार्यक्रमाचे आयोजन

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे
समुद्रपुरः-

तालुक्यातील शेडगाव ग्रामपंचायत कार्यालयात माजी सैनिक तथा सरपंच मुर्लिधर चौधरी यांच्या पुढाकारातून ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या गावातील महिलांना विविध शासनाच्या योजनांची माहिती देण्यासाठी महिला मेळावा व हळदकुंकू कार्यक्रमासह विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी सैनिक तथा सरपंच मुर्लिधर चौधरी, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच निशाताई पावडे, ग्रामपंचायत सदस्य रामभाऊ दाणव,देवकाबाई उईके,रेखा गौरकर,वनिता मडावी, गणपत ढोकपांडे,वंदना येनुरकर,मंगेश शेगोकर, ग्रामसेवक दिनेश थुल आदि प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.यावेळी माजी सैनिक तथा सरपंच मुर्लिधर चौधरी यांनी उपस्थित महिलांना विविध शासनाच्या योजनांची माहिती दिली.तसेच शहरातील महिलांप्रमाणे ग्रामीण भागातील महिलांनी सुध्दा पुरुषांच्या बरोबरीने राजकारण,समाजकारण व गावाच्या विकासासाठी पुढे येऊन आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला पाहिजे तसेच रोजच्या धकाधकीच्या जीवनातून एक दिवस महिलांसाठी एकमेकींच्या विचाराचे देवान घेवाणासाठी मोकळेपणाने मिळावा यासाठी मी ह्या मेळ्याचे आयोजन केल्याची मत त्यांनी व्यक्त केली.या मेळाव्यात जवळपास ३५० महिलांनी सहभाग नोंदविला होता.महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, आयुष्यमान भारत कार्ड शिबीर,उखाणे,फुगे फोडणे, फुगे बाधने स्पर्धा,संगीत खुर्ची,ग्लास ठेवणे स्पर्धा आदिंसह विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या सर्व स्पर्धकांमध्ये



महिलांनी स्वयमपुर्तीने सहभाग घेतला होता.यावेळी स्पर्धेत प्रथम विजेत्या सोनु चौधरी यांना सिलिंग फॅन, दुर्तिय विजेत्या सातघरे यांना ट्रॉली बॅग,तृतीय विजेत्या रुपाली शिंदे मिल्टन वॉटर बॅग,चौथ्या विजेत्या महिलेला हॉटस्पॉट तसेच अन्य १६ विजेत्या महिला भेट वस्तू असे एकुण १८ पुरस्कार तर या मेळाव्यात सहभागी ३५० महिलांना सरपंच मुर्लिधर चौधरी यांच्या वतीने प्रत्येक महिलेला साडी व सुगड देऊन सन्मानित करण्यात आले या महिला मेळावा व हळदकुंकू कार्यक्रमाला येशस्वी करण्यासाठी प्रणाली मुर्लिधर चौधरी, दिपाताई दिनेश थुल,दुर्गाताई चौधरी,मिनाताई काळे,सविता चौधरी, रेखाताई पावडे,जया चौधरी,शरलाताई चौधरी यांनी अथक परिश्रम घेतले.

प्रिआंती इंग्लिश स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा

दैं.जनप्रभात

श्री. गजानन शिक्षण सेवा संस्था नागपूर डरा संचालित प्रिआंती इंग्लिश स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज तरोडी (बु) येथे ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी ध्वजारोहण श्री. रमेशजी लेकुरवाळे सचिव(श्री. गजानन शिक्षण सेवा संस्था नागपुर,) यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी इंग्लिश आणि जी के ऑलिम्पियाड परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केलेल्या विध्यार्थ्यांचा आणि खासदार क्रीडा महोत्सवामध्ये पारितोषिक पटकविणाऱ्या विध्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, सुवर्ण पदक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी भाषण, नृत्य,देशभक्तीपर गीत व प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले कार्यक्रमाला श्री. ऋषभजी राऊत (सामाजिक कार्यकर्ते) श्री. काशीनाथजी खोंडे उपाध्यक्ष शि.पा. संघ कार्यकारिणी समिती



.श्री सतिशजी बर्डे , श्री. शंकराजी घुले ,सौ संगीताताई भोयर (माजी उपाध्यक्ष शि.पा सं का समिती) प्राचार्या सौ.नंदा ठाकरे मॅडम सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी ,विद्यार्थी , पालक उपस्थित होते.

स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या कलागुणाना व्हावं देणे.

स्नेहसंमेलन म्हणजे पर्वणीच शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांची उपस्थिती.

नरखेड प्रतिनिधी ता.२६ आर. एम. इंगोले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय भारसिंगी येथे ५३ वे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. यात विशेष उप्रकम राबवण्यात आले. माजी विद्यार्थी व सेवानिवृत्त शिक्षकांना बोलावण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनात गणेश वंदना, भारतीय संस्कृती, लोककला, शेतकरी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांची अभिनय क्षमता पाहून पालकांनी देखील टाळ्या वाजाऊन दाद दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांना ग्रामगीता भेट देऊन ग्राम वसा जोपासण्याचे काम विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन इंगोले यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटक प्रवीण जोध कृषी व पशुसंवर्धन सभापती जि.प. नागपूर यांच्या हस्ते करण्यात आले.प्रवीण जोध यांनी ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणासोबत इतर व्यवसायाचे महत्त्व सांगत असताना शहरी आणि ग्रामीण भागाचे महत्त्व पटवून दिले. तसेच ग्रामगीता भेट देऊन ग्रामवसा जोपासल्याबद्दल मुख्याध्यापक व संस्थेचे आभार मानले. ठाणेदार चेतनसिंह चौहान यांनी विद्यार्थ्यांना पुस्तक, शाळा व विद्यार्थी जीवन याचे महत्त्व पटवून दिले. तसेच आजच्या आंतरजालीय युगात



स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांसाठी कलागुण सादर करण्यासाठी पर्वणीच असते. सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना कलाविष्कार सादर करण्यास एक चांगले व्यासपीठ उपलब्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांतील सुप्त कलागुणांना वाव मिळतो. सुधाकर अडबाले शिक्षक आमदार

सुद्धा विद्यार्थ्यांनी पुस्तकाशी कसे नाते जोपासावे याबद्दलची माहिती दिली.अनिल गोतमारे यांनी इंग्रजी शाळेतील विद्यार्थी व मराठी शाळेतील विद्यार्थी कसे असतात या बाबत बोलताना ते म्हणाले की इंग्रजी शाळेतील विद्यार्थी हे परीक्षार्थी असतात. तर मराठी शाळेतील मुल विद्यार्थी असतात. त्यांच्या अंगी असलेले सुप्त गुणांना कशी चालना मिळते व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच मराठी शाळेचा ध्यास असतो याबद्दलची माहिती दिली. शिवशंकर खेडेकर पोलीस निरीक्षक नागपूर यांनी स्पर्धा परीक्षा बद्दल मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा कशा असतात व त्यासाठी विद्यार्थ्यांच्या अंगी अभ्यासाचे सातत्य कसे असावे याची माहिती दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत कशाप्रकारे यश प्राप्त करू शकतो याची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांची मन जिंकली. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश इंगोले तसेच सचिव चंद्रशेखर इंगोले व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शाळेच्या विद्यार्थिनी कुमारी साक्षी रोकडे व कुमारी गौरी इंगोले हिने केले. तसेच आभार प्रदर्शन धुरा साक्षी रोकडे या हीने केले. तसेच विशेष उपक्रम अंतर्गत माजी विद्यार्थी व सेवानिवृत्त शिक्षकांचा मेळावा यावेळी घेण्यात आला होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

जाम येथे भव्य रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीर

दैं.जनप्रभात
तालुका प्रतिनिधी अमोल झाडे
समुद्रपुरः-

ग्रामपंचायत जाम व छत्रपती शिवाजी महाराज फाऊंडेशन तसेच महामार्ग पोलीस मदत केंद्र, जाम यांच्या संयुक्त विध्यमानाने जाम येथे मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीराचे आयोजन हिंदु हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व सुभाष चंद्र बोस यांच्या संयुक्त जयंती निमित्त शिबीर आयोजित करण्यात आले. तरी शिबिरात नागरिकांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला. ३००/३५० नागरिकांनी आरोग्य तपासनी करून रक्तदान २०/२५ रक्तदान व माहादान यांच्या संकल्प घेऊन शिबिरार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच शिबिरात नेत्र तपासणी, स्त्रीयांसाठी तज्ञ ड्रॉक्टर, बाल रोग तज्ञ, अस्थीरोग तज्ञ या रुग्णांवर



तपासणी करण्यात आली. गावातील सरपंच सौ. लता पांडुरंग कुडमते, उपसरपंच श्री अभिषेक गिरडकर ,ग्रामपंचायत सदस्या रीमा सातपुते, पुजा प्रशांत धाबर्डे, रोहिणी गोलू दाभाने, संनी निवटे, सचिन गावंडे, पूनम चव्हाण, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते श्री महादेवराव बैलमारे, मोरेश्वरराव सातपुते, चांगदेवराव राऊत, संजय सातपुते, ऋषी सातपुते, प्रमोद चौखे, संदीप भोयर, संजय धाबेकर, छत्रपती शिवाजी महाराज फाउंडेशन चे सचिव प्रमोद उर्फ पिंटू कुडमते, प्रदीप भोयर, हर्षल तांदुळकर, रोशन नवघरे, राहुल देशमुख, स्वप्नील ढाले, रामदास मडकाम, रुपेश किनाके, राहुल कोवे, गोपाल फुकट, तसेच महामार्ग पोलीस मदत केंद्र, जाम येथील सपोनि संतोष सपाटे सर, पोउपनि सुधाकर कुमरे सर, दिलीप थाटे सर, देवेंद्र पटले व सर्व पोलीस अंमलदार तसेच दत्ता मेघे आचार्य विनोबा भावे रुग्णालय सावंगी (मेघे) येथील रक्तदान व आरोग्य तपासणी करिता आलेली टीम यांनी तपासणी आणि मोलाचे मार्गदर्शन करून शिबीर यशस्वीरित्या पार पडले.

संस्कार बहुउद्देशीय संस्था ढाणकी महिला सक्षमीकरण उपक्रम दोन दिवशीय स्टॉल विक्री





दैनिक जनप्रभात
ढाणकी प्रतिनिधीः

सीमा गायकवाड –ढाणकी नगर पंचायत अंतर्गत कार्यरत असलेली संस्कार बहुउद्देशीय संस्था ढाणकी याच्या विद्यमानाने दहा महिला बचत गट एकत्र येऊन गृह उद्योगांमधून बनवलेल्या खाद्यपदार्थाची विक्री दिनांक २३ जानेवारी २०२४ ते २४ जानेवारी २०२४ पर्यंत दोन दिवशीय स्टॉल विक्री केंद्र ढाणकी मध्ये लावण्यात आली प्रथम दिवशी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना पुष्पहार अर्पण करून सौ. ललिता गणेश मामीलवाड यांनी पूजा संपन्न करून स्टॉल विक्रीसाठी सुरुवात करण्यात आली दोन दिवसांमध्ये महिलांनी जे बनवलेली खाद्यपदार्थ होते लोणचे, पापड ,खारोडी, मुगवाडी, हळदीचे लोणचे ,हळदीची भाजी गोड लोणचे, लिंबाचे व मीरची लोचं , मेंदीचे कोन, चटणी चे प्रकार ,शेंगदाणा चटणी, तीळ चटणी ,कराळाची चटणी, जवसाची चटणी ,दह्यामधील मिरच्या, तांदळाचे पापड, बेसन भाकर चा स्टॉल, चहाची स्टॉल मध्ये लेमन ब्लॅकटे, गुळाची चहा , समोस्याची इ.स्टॉल लावण्यात आले होते व त्याची विक्री करण्यात आली दुसऱ्या दिवशी कार्यक्रमाची सांगता बिटरगाव पोलीस स्टेशन अंतर्गत असलेले उपनीरीक्षक मा. शिवाजी टिपूरणे ,वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव जॉन्टी उर्फ़ प्रशांत विनकरे ,लोकमत पत्रकार संघाचे उदय पुंडे , माजी. सभापती व तंटामुक्ती अध्यक्ष ढाणकी शहराचे शिवसेना अध्यक्ष मा .संजय कुंभरवार ,पत्रकार प्रशांत जोशी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अतूल येरावार ,पत्रकार गजू गंजेवाड , नागेश पाटील, समाधान राऊत व गणेश विश्वनाथ मामीलवाड, विक्रम गणेश मामीलवाड इ गावकरि मंडळी उपस्थित होते.व डॉ.सचीन लड्डा संचालक नवोपक्रम,नवसशोधन मूंबइ वीदयापीठ व पार्वती ग्रुप उमरखेड ,बालाजी शिरडकर डॉ. चक्करवार याच्या कडुन दहा महिला बचत गटातील स्टॉल विक्रीसाठी लावलेल्या महिलांचे व संस्कार बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष ::सीमा तानाजी गायकवाड सौ. ललिता गणेश मामीलवाड, सौ. स्वाती विक्रम मामिलवाड , श्रीमती सुनिता विठ्ठल तोडत उर्फ (भोसले), सौ.माया राजेश गायकवाड, सौ.जयश्री शालिग्राम खळकर, सौ.पूजा सत्यपाल गायकवाड ,सौ,साधना प्रवीण गायकवाड स्नेहा करण सावरकर, सीमा परघने ,मंगल हटकर यांना प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

जीवनातील अनेक समस्या सकारात्मक विचाराने सुटतात –प्रसिद्ध कवी केशव खटिंग

दैं, जनप्रभात
परभणी प्रतिनिधी
अरविंद कांबळे

पूर्णा –श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय पूर्णा येथे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाली यावेळी प्रसिद्ध कवी केशव खटींग यांनी विद्यार्थ्यांना कविता च्या माध्यमातून खेळवून ठेवले विद्यार्थ्यांनी हसत खेळत जीवन जगले पाहिजे तसेच अभ्यासासोबत आपल्या भविष्याचा वेध घेतला पाहिजे याकडे लक्ष वेधले , यावेळी प्रस्ताविक करताना डॉ के राजकुमार यांनी मागील ४० वर्षात महाविद्यालयाने घडवलेल्या विद्यार्थ्यांची समृद्ध परंपरा विशद केली तसेच महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना वाव देण्यासाठी केलेल्या कार्यक्रमाची रूपरेखा मांडले. विद्यार्थ्यांनी खेळासोबत अभ्यास यशस्वी





व्हावे असे विचार मांडले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे पदसिद्धअध्यक्ष डॉ श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांची उपस्थिती होती तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कार्याध्यक्ष माननीय प्रमोद अण्णा ऐकलारे, सहसचिव प्रा गोविंदराव कदम यांची उपस्थिती होती स्नेहसंमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच संस्थाचालकांकडून जवळपास ३३ प्रकारची बक्षीस त्याची एकूण रक्कम ४२ हजार रुपये ही विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून प्रदान करण्यात आली , क्रीडा स्पर्धा सांस्कृतिक स्पर्धा यात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य डॉ शिवसांब कापसे व डॉ गजानन कुरुंदकर उपप्राचार्य अबाजी खराटे पर्यवेक्षक प्रा उमाशंकर मिटकरी ,सांस्कृतिक विभाग प्रमुख वृषाली आंबटकर,यासह विद्यालयातील प्राध्यापकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ ओमकार चिंचोले, डॉ ज्ञानेश्वर वैद्य, प्रा चारुदत्त डाफणे, प्रा दिनेश पवार यांनी केले

महिला बचत गटाच्या उत्पादित वस्तु विक्री व प्रदर्शनाचे आयोजन

सोलापूर (प्रतिनिधी):– महिला बचत गटाच्या उत्पादित मालाला बाजारपेठ मिळावी व जाहिरात प्रचार प्रसार व्हावा या हेतूने दिनांक २६ ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीत माविम व नाबार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरावर महिला बचत गट उत्पादित वस्तु व खाद्यपदार्थ विक्री आणि प्रदर्शन वोरोनोको हायस्कून, रंगभवन जवळ, हिराबाई देवकर प्रशालेजवळ, आयोजन करण्यात आले असल्याची माहिती माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी, सोमनाथ लामगुंडे यांनी दिली. विविध योजनेअंतर्गत स्थापन करण्यात आलेले १० हजार ९३० स्वयंसहायता महिला बचत गट व १ लाख १५ हजार ६४१ सभासद आहेत. बचत गटांच्या चिरकालीन संस्था टिकण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागात लोकसंचलित साधन केंद्र व शहरी भागात शहरस्तरीय संघ ही संकल्पना पुढे आली. या संकल्पनेच्या आधारे सद्यस्थितीमध्ये जिल्ह्यात एकूण २२ ग्रामीण व १० शहरी केंद्र व्यवस्थापक व त्यांच्या अधिनस्त कार्यरत असलेला इतर कर्मचारी वर्ग, यांच्या माध्यमातून चालवत आहे. नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्योम विकास प्रकल्प हा शासनाचा महत्वकांक्षी प्रकल्प असून या प्रकल्पाच्या माध्यमातून गरीब व गरजुवंत कुटुंबाचा सामाजिक, आर्थिक विकास साधने असा आहे. महिलांचे स्वयं सहाय्यता बचत गट स्थापन करून विविध वित्त पुरवठा संस्थाकडून वित्त पुरवठा केला जातो. त्यामधून महिलांनी शेती, बिगर शेती व्यवसायात भांडवल गुंतवणूक करून उद्योग व्यवसायाची उभारणी केली आहे.

रामटेक तालुक्याअंतर्गत मौजा खनोरा येथे आयोजित कबड्डी स्पर्धेला – माजी मंत्री श्री.राजेंद्र मुळक यांची उपस्थिती.

दैनिक जनप्रभात
जयश्री मेंघरे रामटेक

दिनांक २७/०१/२०२४ रोज शनिवारला रामटेक तालुक्यातील मौजा खानोरा येथे आयोजित कबड्डी स्पर्धेला मा.श्री.राजेंद्रजी मुळक (माजी मंत्री तथा अध्यक्ष नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी) यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी सर्व खेळाडू आणि उपस्थितांशी चर्चा करून अशा पद्धतीच्या स्पर्धांचे आयोजन सातत्याने होत राहिले पाहिजे असे मत व्यक्त केले.यावेळी श्रीमती. शांताताई कुंमरे (जि. प.सदस्य नागपूर), सौ. सरलाताई खंडाते (सरपंच ग्रा.प.खनोरा), श्री.महेशजी बह्मनोटे (माजी सभापती जि.प.नागपूर), श्री. रवींद्र कुंमरे (माजी उपसभापती प.स.रमटेक), सौ.स्नेहा भांडारकर (सरपंच, बेलदा ग्रा.पं), श्री.उमेश भांडारकर (माजी सरपंच, बेलदा ग्रा.पं), श्री. चंद्रकांतजी कोडवते (प.स सदस्य), श्री. महेश मडावी (माजी सदस्य प.स. रामटेक), श्री. इमारचंदजी भलावी (माजी



सरपंच ग्रा.प.खनोरा), श्री. हेमराज कंगाले (उपसरपंच ग्रा.प.खनोरा), श्री. कमलेश इनवाते (सदस्य ग्रा.प खनोरा), श्री. गोविंदजी भलावी (सदस्य ग्रा.प. खनोरा), श्री. तुलसीराम खंडाते, सौ. जयश्रीताई इनिवाते सदस्य ग्रा.प. खनोरा), श्री.सोहनलाल कंगाले (शिक्षक जि.प .नागपूर), आदी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा पिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/2020/82242